

# यात्रिक

शरच्चंद्र मुक्तिबोध

REFBK-0009406
REFBK-0009406
म. ग्र. स. ठाणे
विषय काव्य
सं. नं.

# यात्रिक

शरच्चंद्र मुक्तिबोध

REFBK-0009406
REFBK-0009406

मौज प्रकाशनगृह

किंमत साडेतीन रुपये

मौज प्रकाशन : २७

पहिली आवृत्ति : २२ डिसेंबर १९५७
सर्व हक्क कवीच्या स्वाधीन

वेष्टनावरील चित्र
द. ग. गोडसे

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन-गृह,
खटाववाडी, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 23048 वि: काव्य
क्रमांक 9359 नों दि: 20/3/58

*माझे वडील*

ती. माधवराव गोपाळ मुक्तिबोध

*यांचे चरणीं*

हा माझा दुसरा काव्यसंग्रह. 'नवी मळवाट' या माझ्या पहिल्या काव्यसंग्रहांतील कविता वगळल्यास मीं आजवर लिहिलेल्या जवळजवळ सर्वच कवितांचा समावेश या संग्रहांत झालेला आहे.

'मौज प्रकाशन'चे श्री. पु. भागवत यांनीं या कवितासंग्रहाच्या प्रकाशनाचें कार्य अंगावर घेतल्याबद्दल मी त्यांचा कायमचा ऋणी आहें. माझे मित्र व महाराष्ट्राचे श्रेष्ठ कवि श्री. विंदा करंदीकर यांचेंहि साहाय्य या संग्रहाच्या बाबतींत झालें आहे. मी त्याबद्दल त्यांचा ऋणी आहें.

नागपूर,
१-१२-५७

शरच्चंद्र मुक्तिबोध

# मला ओळखावयाला

मला ओळखावयाला
हवें माझें स्वप्न तुला
माझा असा जीव हवा
माझी तळमळ तुला

धूळीमध्यें माझा माथा
नम्र होतो ज्याच्यामुळें
विराट त्या गगनाचा
थोडा हवा भास तुला

भरलेल्या संसारांत
तडफडे आत्मा ज्यानें
स्वतःचाच जाणवाया
हवा कारावास तुला

एका जीवनांत बहु-
जन-दुःख जगतांना
औदास्य ये त्याचा तुला
थोडा अदमास हवा

मी हा असा अस्ताव्यस्त
कासावीस सदोदित
माझ्या दुःखाचा आवांका
तुला ओळखाया हवा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम क्रमांक

कण्हणाऱ्या जीवनाच्या
तळीं आंथरावा जीव
पीडेंतील चैतन्याचा
तुला स्पर्श.व्हाया हवा

तुझा माझा पीळ एक
गळे घाम सारखाच
शब्दांशब्दांतून जीव
उडी घेई तुझ्याकडे

माझ्या हृदयींचें रक्त
मजकूर लिही ताजा
वितळून टाकील तो
तुझ्या-माझ्यांतील कडे

११-१-५१

# हिऱ्यासम लखाखते डोळे

युगाचा अंधार अपरंपार
झाळाळे नवीन पोलादी वास्तव
वज्रकठोर !

संगिनी घेऊन घालती गस्त
चिल्खती उंचेल्या दळदार छाया
सावध फिरती खण्खण करीत लोखंडी बूट ते
शांतीच्या छातींत खिळे गाडीत !

मनाई आहे ! मनाई आहे ! !
रात्रीच्या श्वासास केलेली बंदी
चपट्या पॉलिश केलेल्या नाकांचीं
अडदांड अवजड पोलादी यंत्रें
तुड्वीत जातात काजळी रात्रीची
डामरी दलदल.

...मनाईनेंच
धुरकटलेल्या झाडांचे हात-छाटले गेले
...मनाईनेंच
उन्मुक्त संगीत निर्मिणारे ते पल्लवपुंज जाळले गेले !

झाडांचे हात काटकोनांत...
गळफांस देऊन टांगून द्यावया उपयोगी निश्चित !
कुणाचे अदृश्य पंजे गळ्यास
क्रूरपणानें दाबीत आहेत
पंचप्राण हे गर्गर फिरती
बुडबुड्यासारखे वर येतात

दम कोंडला!
श्वास रोधला!!
तरीहि अस्फुट घोगरी दुहेरी
लट्लटणारी व्यथेनें गहिरी
किंकाळी येई धापा टाकीत...

"असह्य आहे! असह्य आहे!!
असह्य आहे! असह्य आहे!!"

दुमदुमे जखमी किंकाळी काळी
सळाळे जणुं कीं नागीण काळी
अंधारलेल्या भुयारांमधून
ढांसळलेल्या झोंपड्यांमधून
छतें उडाल्या घरांमधून...

...काजळी रात
पुलाची काजळी उंच कमान
वाहतो शेजारीं काळाच गाळ बुडबुडे सोडीत
भिंतीशीं ताठ उंचेलें कोणी उभें रोडकें
पिस्तूल-नळी भालीं दाबली
वटारलेली दीठ मेलेली
शरीर ताठ...
धडाड्...धाड्...
वाटे कीं पुलाचें मोडलें हाड!
कमान उंच हादरा खाई
शरीर एक गिर्की घेऊन ओहळामध्यें लोळत जाई
फिरे सर्सर पाण्यावरून
पाठलागीचा टॉर्चलाइट...
पुलावरून सुटे प्रकाश

दिसती तेथें
लोखंडी टोप्यांच्या छायेखालतीं
रबरी चेहरे सुजके जाड...!!

फिरून माजे आत्महत्येची काजळी रात्र
किंवा ही छाया दोन युगांच्या मधील मात्र?

युगाचा अंधार अपरंपार
झळाळे नवीन पोलादी वास्तव
वज्रकठोर!!

*        *        *

अंधारीं घरें
वाहत्या जखमेसारखे आहेत तांबडे ठिपके
आंतील आगीचे...

(राही ती आंतल्या आंतच आग!
राही ती आंतल्या आंतच आग!!)

अंधारीं घरें
इमारती उंच अंधाराच्याच
निळसर दिव्यांचा पापी नि फिक्ट अंधुक प्रकाश!
दर्वळे रेशमी सारंगीची तान
...नाचते नारी ती नागवी लाचार
करीतसे नाच
कृतांतभयानें लट्लटां कांपत
हालवी कंबर
डोळे फाटतात वरतीं बघून
फाटेना अंबर!

कंपित स्तनांच्या वरतीं मारती धनाच्या थैल्यांस
अंधार-राज्याचे मालक नूतन
मनांत अत्यंत आनंदी होऊन!

दूर कोठें तरी भुयारें आहेत
संक्षिप्त हत्येचीं...
तेथेंहि आहेत धनीच बंदिस्त
लांब खोड्यांमध्यें पाय अडकले
टोकाकडे एका एक पाय आणि
दुसरा दूर दुज्या टोकाकडे
शरीर चिरलें जातसे मधून
कण्हती अत्यंत व्याकूळ होऊन
विचारांचे धनी
जीवनाचे ज्ञानी
कोणी महामानी!! ...

दुःखांच्या गळ्यांत...
नागमोडी रांग चालतसे काळी
अवजड बुटांचा ओबडधोबड पसरट आवाज
पाठीशीं संगिनी...
सोबत चालती अनेक ते पाय
वजनी बेड्यांना कष्टानें ओढीत

खळ्खळ! खळ्खळ!
खळ्खळ!! खळ्खळ!!
उदास आवाज पायींच्या बेड्यांचा
काळ्या आकृतींची नागमोडी रांग
सरकते संथ
दूर कोठें तरी मेलेला, उदास, विषण्ण ध्वनि तो

जातसे विरून
राहते उरून अशांत स्तब्धता...
अत्यंत कडवट चवच जशी ती आजारी जिभेची!

युगाचा अंधार अपरंपार
झळाळे नवीन पोलादी वास्तव
वज्रकठोर!!

*    *    *

दाटशा अंधारीं
जुनाट बोळांत
जुनाट वाड्याच्या वळचणीखालतीं
उंच ताडासम सताड उभा मी!
नसांत काळें रक्तहि हालेना
श्वास मला माझा चालला वाटेना
पापणीहि माझी लवतां लवेना
यातनाशूलानें छाती चिरलेली
स्वप्नांच्या उध्वस्त ढिगाऱ्यावरतीं
बुजगावण्यागत फाटका उभा मी!

कोठेंहि नाहीं जावयाचें मला
कांहींहि नाहीं सांगायाचें मला
कोणासहि नाहीं निरोप द्यायाचा
पोंचवायाचा ना कोणास संदेश
निरवानिरव नाहीं करायाची
येथें कांहीं नाहीं, तेथें कांहीं नाहीं!
कोठें कांहीं नाहीं!!!...

भिंतीचे काळे पाषाण उभेत
दगडांचे काळे ढीग सांडलेले
वाकडेतिकडे अनेक चेहरे!
माझींच शवें का?
पाहती मजकडे टक लावूनिया...

देतोंच मी पाय माझ्या प्रेतांवरी
दगडांवरी या...

चित्कार! किंकाळी!! कर्कश, सावेश
विलक्षण कटु आणि धारदार
निघे तयांतून
पाय दिला त्याच दगडांमधून!!

नाहीं ते दगड...
काळ्याशा शिशूंचे देहच आहेत
गुंडाळी करून हारींत झोंपले
त्यांचाच चित्कार,
त्यांचा प्रतिकार!!

वेगानें धांवत आल्या काळ्या छाया
भरारत आल्या.
फाटकेसे देह!
फाटकीं लक्तरें!!
वाढलेल्या दाढ्या!
जळणारे डोळे!!
वेढून टाकलें अंधाराच्या एका कोटानें क्षणांत
तरंगूं लागले अंधारावरतीं पेटलेले डोळे

अपमानें एका सारे जागलेले
(पवित्र घृणा ती !!)
भिंतीस चिकटल्या जीर्ण जाहिरातीसम मी वेगानें
थरथरूं लागलों
पोलादी घृणेनें जबर आघात
समग्र व्यक्तित्व-पिंडावरतीं...
मनानें मांडला विराट आकांत
आजच्या चरम पीडेच्या क्षणांत
वाटलें जगणें अशक्य आतां
धांवा मीं मांडला
'अनायासें आला, येई येई मरणा
करी या कुंठित जीवनाचा चेंदा!'

परंतु जन्मलों...
आकांताच्या एका संकट-क्षणांत
व्यक्तित्वाचा अणु विच्छिन्न जाहला
आरपार जणूं बदलून गेलें सारेंच व्यक्तित्व
...जुन्याच तत्त्वांचें नवीन मिश्रण!...
फाडून टाकली मधोमध उभी अमानवी भिंत...
दाट अंधारांत, कभिन्न नि उग्र
व्यक्तींचा तो क्रोध
क्रोधाच्या मागील तेजाबी विद्रोह
विद्रोहामागील संतप्त माणुसकी...
जाहलें दर्शन त्या क्षणीं तियेचें!
ढांसळे धरण मनाच्या मृत्यूचें!
मोकळा जाहला माझ्या भावनांचा बेचैन समुद्र!

भावनांच्या तुंग हिल्लोल तरंगांवरतीं सहज
अमावास्येंतील झंझेंत वेगानें झुलणाऱ्या काळ्या जंगलासमान

अंधाऱ्या मानवी लाटांस भेटलों
उत्कटतेच्या सहस्र बाहूंनीं !!
गेलों मी जवळ
उत्कट...कांपत !
खांद्यावरी हात ठेवतां क्षणांत
क्रोधाची झंझा ती पावली विराम...

ऐक्याची अंतस्थ अनुभूति खोल
समान पीडेची जाणीव अमोल!!

लाभलें मनाला सूक्ष्म आश्वासन...
डोळ्याच्या आकाशीं उडत होती जी अनंत धूळ
अवचित वेगें मेघांचे तरंग ओथंबून आले
शरीर समग्र थरारून गेलें!
—विराट क्रोधानें
नव्या विश्वासाचा निर्मिला आधार!!
विद्युल्लतेसम—
पाठीच्या कण्यास फोडीत गेली ती
उत्कट सुखाची यातना-वेलांटी !

मृत्यूच्या अफाट ओसाडींत आज
लाभला स्पर्श
भरीव, बलाढ्य पोलादी पिळाचा!!...

युगाचा अंधार अपरंपार
झाळाले नवीन पोलादी वास्तव
वज्रकठोर ! !

* * *

अंधाऱ्या गल्लींत दिसावी मजला घराची या वाट
दिसावी गुलाबी सडपातळ ज्योत
म्हणून रोज तूं प्रतीक्षाप्रदीप खिडकींत ठेवसी
आज तोहि लावला नाहींस कशानें ?
किंवा तो विझून गेलेला आहे का
थकूनभागून एकाकी स्नेहाविनाच बिचारा ?

ठन् ठन् ठन्...
...तिनाचे ठोके हे !
सांगती किती ही उलटली आहे आतां दुःख-रात
प्रतीक्षेचा धीर अजून तुझ्यांत ?

खिडकींतून अंधुक उजेडांत जरा
भिंतीस टेकून बसलेली तुझी समोर बघत छायातनु
मूर्त कातर प्रतीक्षा !
सरळ उदार नासिकेची रेषा...
कपाळाशेजारीं हालणारी बट...
वक्षाच्या रेखेचें मंदश्वासासह सूक्ष्म आंदोलन...
झोपेंतहि माझी वाटच बघत बसलीस का तूं ?

जाग गडे ! आलों तुझा अपराधी !
तुझिया प्रेमाची आबाळ करून
काजळी रातीचा भार वाहणारा
अत्यंत व्याकूळ समर्पणाचें उपेक्षून मर्म
स्वतःभोंवतींच स्वतःचें व्यक्तित्व गुंडाळणारा !
सत्याचें, मानवी प्रगति-रीतीचें उडालें रोगण
...जाहलों हैराण
अशा जगाकडे फिरवून पाठ
...जाहलों कृपण !!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २३०४४ वि. ...
क्रमांक ...३३८८ नों. दि. २८/३/५८

दुःखानें हिरवेंगार माझें तोंड
आत्महननाच्या विकृत वेगानें निळें जाहलेलें माझें हें व्यक्तित्व
असमर्थ होतें सर्वस्वदानाची भाषा उमजाया
तुझिया प्रीतीची विलक्षण शक्ति किंचित् जाणाया !!

तुझी गडे प्रीत
सदा नवी रीत

तुझें माझें द्वंद्व
एकमेकांच्या ग प्रेमांत जन्मून वाढूं दोघेंहि
एकमेकांच्या ग परिरंभणांत नवसमन्वय गांठूं दोघेंहि
डोलणाऱ्या दोन प्रदीपशिखांचा एकच जळता पीळ दोघेंहि
नारी ! ये खांद्याशीं खांद्यास भिडवून मृत्यूचें काळीज फोडूं दोघेंहि

आत्महत्येचिया भुयारामधून आलों मी बाहेर
काळोखामध्येंहि तुझीच होती ना चाहूल अलगत ?
रातीच्या दरींत एकाकी होऊन हिंडलों जेव्हां
हवेच्या श्वासांत तुझ्याच जिवाची होती ना संगत ?
सत्याचा प्रहार होऊन जेधवां भंगलें जिव्हार
तेव्हांहि जीवनशक्ति बनून राखलें तूंच...
...आणि या मरण-मोहाच्या क्षणींहि
अमर प्रेमाची निर्मात्री तूंच !

सहचरि जाग ! प्रेरणे जाग !!
बघ कीं माझिया तनूंत समुद्र बलाढ्य वेगानें हेलावत आहे
बघ कीं प्रचंड तुफान मनांत भावना-अरण्य झुलवीत आहे
पहा ना माझिया डोळ्यांत अनंत तारक वेगानें तुटताहेत
बघ कीं पोलादी स्पर्शानें माझें सामर्थ्य पोलादी जाहलेलें आहे

प्रतीक्षातुरे गे, अंधारींच ऊठ ! खिडकींतून जरा बाहेर पहा तूं
आकाशाचा व्यास वेगानें कापीत दोन तारकांचा प्रवास पहा तूं
ऊठ ! या अणूचा स्फोट जाहलेला
आतां सर्वव्यापी शक्तिच आहोंत
खांद्याशीं खांदा, कराशीं कर, चरणीं चरण जुळवून चालत
जाऊं अंधाराशीं लढत लढत
पोलादाचा पीळ गळींत गे त्याच

युगाचा अंधार अपरंपार
झळाळे नवीन पोलादी वास्तव
वज्रकठोर !!

* * *

रातीचे ढिगारे उंचनिंच दूर दूर पसरले
आकाशाचा काळा पट्टा कललेला, मागें टेकलेला !
विलक्षण स्तब्ध गूढ गुर्फटलें सारीकडे कांहीं
गस्त घाली कोणी, तरंगे संगीन, नाहीं ! चैन नाहीं.

नागवे हम्रस्ते हात पसरून गपचीप झोंपले
गल्ल्यांचा गुंताहि अंग दुमडून निपचीत पडला
रेस्टॉरंटें बंद, सलूनेंहि बंद, बंद ते पानांचे लहानेले ठेले
बोलचाल बंद, हालचाल बंद, श्वासोच्छ्वास बंद, जग काय मेलें ?
दरवाजे बंद, खिडक्याहि बंद, शंटिंगहि बंद दूर इंजिनाचें
हूं का चूं करीना कुणी स्टेशनांत, कांटे निखळले जून घड्याळाचे

तरी भय नाहीं !!
नाहीं भय नाहीं !!

भयाचा हा नाहीं शुक्शुकाट; कांहीं निराळेंच आहे !
तुझें-माझें गडे ! सर्वस्व त्यांतच सामावलें आहे !

वळचणीखालून जरा संथ चाल ! नंतर झपझप पाऊल उचल
खरें तें मोठ्यानें नको बरें बोलूं, बंदुकीची गोळी चिंध्या उडवील ! !

घोर या यातना; क्रूर तो अन्याय; निर्दय अपमान
साहत, तगत युगेंयुगें आलें आहे... तें महान जीवनसामर्थ्य
महान माणूस !
तयाचा संकल्प पोलादाची कांब
कांहींहि कधींच वायां नाहीं जात...
प्रिये, जरा थांब !
बंद खिडक्यांना किल्किल्या करून डोकाव ना आंत
निखाऱ्यासारखा संकल्प पेटला दिसेल डोळ्यांत
खोल्याखोल्यांमध्यें, गल्ल्यागल्ल्यांमध्यें, पुलांच्या खालतीं,
बंद हॉटेलांत, काळ्या सलूनांत, इषाऱ्यांनीं फक्त चर्चा चालताती ! !
थांबूं नको ! चाल !
घरटें मागेंच सुटलें आपलें

आठवते काय आपली बाळी ती ?
तुझ्या अंकावरी प्राण सोडतांना आठवते काय तियेची दीठ ती ?
तीच हिर्मुसली घोटाळती दीठ मागतसे न्याय !
आणि बघ काय ?
लाल नी शेंदरी जळती तल्वार रात्रीस फोडून येतसे बाहेर
छे, छे, ती तिरीप लाल प्रकाशाची—
किल्किल्या कवाडांतून ये बाहेर ! !

युगाचा अंधार अपरंपार
झळाळे नवीन पोलादी वास्तव
वज्रकठोर ! !

*　　*　　*

काढलेले डोळे, जेथें होत्या फक्त खांचा
लखाखती तेथें लालभडक डोळे
युगें युगें जेथें होते काजळी कोने
तेथें नवें हृदयच धडधडूं लागे
काळें काळें थंडगार रक्त मेलेलें
तेथें ऊन ऊन रक्त सळाळे वेगें
गलिच्छ, उदासवाणें अश्रूंचें जग
तेथें नवाकांक्षा-ज्योतिश्चक्र उदेलें

एक काया ! एक रक्त ! एक मानव ! !
एक दुःख ! एक काळी घनघोर निशा ! !
अंधाराच्या पहाडांत विवरें लाल
जळणारे डोळे ! त्यांत फांकल्या दिशा !
असें दुःखी विषण्ण हें तळजीवन
अशी आहे महाक्रुद्ध रुद्र जाणीव
आकाशाच्या घुसटांत, पृथ्वीवरतीं
'तूं', 'मी', 'सारे' एक झालों, जन्मला जीव ! !

एक विश्वप्राण पेटे, 'तूं', 'मी' सरलें
गेली लाचारी नि लाचारीचें मरण
चैतन्याच्या सागराचा स्पर्श जाहला
त्याच्या स्पर्शांतच उभें असरपण

रोखाल कसा हो चंड मार्तंड-जन्म ?
थांबवाल मतवाली झंझा भीषण ?
भयंकर स्फोटकारी ज्वालामुखी तो
शांतवाल त्याचा महास्फोट दारुण ?
धरेचा खळखळा करी भूमिकंप तो
शमवील कोण त्याचा दारुण क्रोध ?

कोण कसा थांबवील युगायुगांच्या
पीडलेल्या मानवाचा गौरवबोध ?

सूर्याहून दिव्यकांत तेज आगळें
झंझेहून उद्दाम नि वेगवान जी
ज्वालामुखी-स्फोटाहून कराल काली
भूकंपापेक्षांहि महानाशकारी जी

अशी आहे महाव्यथा-तनया क्रांती
पिंजारून येत आहे ज्वालांचे केस
सत्तापशू किंचाळत उम्यानें जळे
गळतसे मृत्युमुखामधून फेस

उडाला आकांत यंत्रदैत्य रेटले
लोपलें शहर धूम्रजटेंत काळ्या
कोटिकोटि ज्वाळा आतां घेरती केंद्र
खरा इतिहास आतां आरंभ व्हावा

अत्युष्ण पांढरी आग जळे सभोंतीं
तुझी-माझी त्यांत होरपळते काया !!
शिरूं ये आगीच्या श्वेत मर्मांत दोघें
चरमक्षणाचा मूलस्पंद जगाया...
एक हाहाकार ! आणि फाटे गगन
कडकडाट ! आणि सत्ता झाली खंड खंड
नवें मन्वंतर आतां येतें जन्मास
मृत्यूचे ते तुटलेत सांखळदंड !!

*   *   *

उद्यां एका हिर्व्यागार टेकडीवरी
हांसत हांसत दोघें उभीं राहूं का ?
सभोंवार हिर्व्यागार जगांत सुखी
हिऱ्यासम लखाखते डोळे पाहूं का ?

१४-८-५०

# कोण अंधारांत उभें ?

कोण अंधारांत उभें वळचणीखालीं ?
काळोखास कशामुळें शिरशिरी आली ?
उंच किडकिडीत यष्टि, कवड्यांचे डोळे
वासनेचें भूत जणूं उभें उंचेलें
निश्चळली दीठ, ओठ जरा हालती
अशी कशी चाल, कशीं तोंडें लोंबतीं ?
पिळ्वटत काळा ज्वर अंगांगीं चढे
काळा युगनूर ! एक विश्व उघडें ! !

—"नाहीं बोलवत कांहीं उभेच राहूं
अबोलांत परस्पर हृदय पाहूं...

ओठीं शब्द आले न आले तों विरले
खोल बोल हृदयींचे कंठीं अडले
दो जीवांचें एक जग क्षयानें मेलें
यौवनाचें झाड अस्थिपंजर झालें...

गल्लोगल्लीं धुड्कावल्या श्वानासारखे
खुषमस्करे झालों तरी जगापारखे
पोटीं पाय, प्राणतनूवरी खवलीं
स्वरक्षणासाठीं नित्य वाढविलेलीं

सरिसृपासम रूप ! ! सदा इमानी ! !
नाचलों नि तनूचिया केल्या कमानी ! !
पाचोळ्यासारखे भिरभिरी फिरतों
घोर पापासम अंधारांत दडतों...

नाहीं कधीं जिवाच्या जिवानें हसलों
पोटीचें सांगून नाहीं कधीं रडलों..."

—कोठें तरी सोसाट्यांत जंगल डोले
वन्य ओढा पुलाखालीं वेगें सळाळे
झोके घेतां दिसतात कंदील लाल
जणूं गर्‌गरती पीडा-रात्रीचे डोळे—

"इथें अंधारांत वन्य पुलावरतीं
स्तब्ध उभे राहूं ऐकूं घों घों ध्वनि ती...

एका आयुष्यांत दुजासाठीं राबलों
पंचप्राण आवेगानें कधीं ना जगलों !!

आकाश-आकार गोल नाण्याचा झाला
धरित्रीचा व्यास भुजंगानें घेरला
झालींत ठिक्कर काळीं सत्याचीं नाणीं
पोटावरी लाथ हाणी उदात्त वाणी !!

...यातना असीम आहे, बोलवत नाहीं
हृदय रितेंच आहे, सांचलें न कांहीं
रूप नाहीं, रस नाहीं, गंधही नाहीं
कुतूहल नाहीं, क्षीण धुगधुगी नाहीं..."

—इथें अंधारांत वन्य पुलावरतीं
स्तब्ध उभे राहूं ऐकूं मंद ध्वनि ती—

"प्रेम नाहीं, प्रेमासाठीं शक्तिहि नाहीं
तरी प्रेमाचीच वाट कशानें आहे ?

आस नाहीं, आसेचीहि आस नाहीं जरी
तरी तक्रारींत आस कशाची आहे ?
जीव नाहीं, जीवनाची धुग्धुगी नाहीं
तरी कसें जीवनाचें बोलणें आहे ?
तुमच्या ना, कुणाच्याशा यातनेपोटीं
खचितच यौवनाचा बहार आहे !"

१०-१-५१

# शक्य तर कधींमधीं

शक्य तर कधींमधीं मला स्मरशील ना ?
तिथें दूर माळवांत
वडाच्या सघन पर्णराजीच्या पल्याड जेव्हां
सरत्या सांजेचे रंग
अत्यंत तन्मयतेनें कधीं बघशील तूं...
तोडून घेशील काय
माझ्या स्मृतीसवें मृदु लाल वटपान तूं ?
तक्रार ना जीवनाची (...आणि ना करणार कधीं)
मुखावरी सळ एक कुणा ना दिसणार कधीं
चुकूनमाकून तरी निरोप धाडशील ना ?
कबूल ! कीं शोभते ना तडफडती गति ही
डोळे जरी तांबारले
उजाडे तों जागण्याची हट्टी मनोवृत्ति ही !
कसें सांगूं तुला आतां ?...
जिवा नसे चैन गे !
नसे ही सहजवृत्ति तारुण्यांत ऐन गे !
बुभुक्षित वेग एक
हाडीं ज्वर खिळलेला
जादुगार नाचवितो, आम्ही करीतसों लीला !
विकृत आमचीं मुखें...तरीहि ओढतें कांहीं
काहिली जिवाची एक क्षणहि शमत नाहीं
क्षमा कर ! प्रीत तुझी
अगदींच अपुरी आहे, शमविण्या संथ संथ जळणारी आग ही !
वेगाच्या बळीस अशा तरीहि कांहीं ना कांहीं
सांग धाडशील ना ?

उरलें नसेल कांहीं, उपेक्षाच धाड तूं !
दाहामुळें कोरड्या या, तडा गेल्या डोळ्यांतून
अशानेंच वाहूं दे ना
मुक्त अश्रुधार तूं !

१-१०-४१

# द्याल ना आशिस-दान

पाठिशीं विराट ओझें दुःखानें बधिर गात्र
दास्याच्या अंधारांतून कोटिशः शरीरें जात
कर्माच्या चरकांतून पिचून निःसत्त्व होत
जीवन जाहलें होतें विषाचा कडवट घोट

युगानुयुगें जें होतें भोळें नि उदासवाणें
रक्तानें, घामानें भिजून जीवन केविलवाणें
प्रचंड कष्टांचे डोंगर छाती ती फाटून जाय
उभा तो मोडक्या दाराशीं नागवा निरन्न हाय!!

त्यांच्यांतलेच होऊन, दुःख तें महान जाणून
मृत्यूच्या छातींत तुम्हीच मारला तेजाचा बाण
स्थापून मानवी गौरव जीवना आणली जाग
अश्रूंचे विवश प्रवाह बनले प्रखर आग

असीम यातना बनल्या वज्र तें शत्रूस काळ
गोठल्या रक्ताच्या पेटल्या कोटिशः मशाली लाल
मेलेल्या नसांत जागला बेबंद क्रुद्धसा त्वेश
वाळल्या स्नायूंत सळाळे जळत्या धातूचा रस

अंधाऱ्या डोळ्यांत फांकल्या नवीन तेजाच्या वाती
बधिर हृदयें नवीन प्रकाशें अस्थिर होती
जागलें युगांचें बद्ध चैतन्य उन्मत्त आतां
जागल्या सहसा कशा त्या बलाढ्य सागरलाटा ?

वेगांत कापीत अंतर सुटला मानव-बाण
तुम्हीच लखलख जळतें अग्र तें शोभायमान

उध्वस्त केलात पहिला कोट तो शत्रूच्या किल्याचा
नभाच्या डोळ्यांत अजून सांचला धुराळा तयाचा
मांडून नवीन झुंजच केलींत हृदयें निर्माण
म्हणून झुंजारा तुमचीं क्षितिजें फांकली महान !

अत्यंत सहनशील...जो केवळ धरित्रीसमान
भूमीचें किंचित स्पंदन जाणती जयाचे प्राण
प्रथम संस्कृतिस्थापक सतत झिजून झिजून
मांडली तपस्या निसर्गाविरुद्ध झुंजून झुंजून

प्रसन्न जाहली धरित्री तपस्या अत्युग्र पाहून
प्रकट जाहली अन्नदा ! मातीचा बुरखा सारून
हिरवा झुळझुळ शालू नि पिवळ्या करांस पसरून
अनंत हस्तांनीं ओपिलें माणिकमोत्यांचें दान

तोच हो किसान प्राचीन प्रथम सर्जक कलेचा
निर्मिलीं परमसुंदर शेतें तीं, पट तो भूमीचा
भूदेव कालच होता हा धुळींत लोळता किसान
डोळ्यांच्या दारांत अडले जयाचे उडते प्राण

तुम्हीच वांकलां खालतीं दिलात तयास हात
जनांदोलनाचा दिलात तयास पहिला पाठ

चाळीस कोटींचा सागर कधींचा गोठला होता
तुमच्या प्रेमळ स्पर्शानें जागल्या डोंगर-लाटा
युगानुयुगांची संस्कृति तुम्हांत साकार झाली
तुमच्या चरणस्पर्शानें धरणी आकाश झाली

फिरून आमुच्या जाहल्या प्रसन्नसलिलासरिता
आमुचें गगन जाहलें, आमुची धरणी माता
दऱ्यांत खोऱ्यांत घुमेल तुमच्या प्रेमाचें गीत
येणाऱ्या पिढ्या नि पिढ्यांस स्मरेल तुमची प्रीत

आणि या प्रीतीचें पोलादी चिल्खत अंगांत घालून
विराट उभा जो मानव बलाढ्य विद्रोही बनून
अन्यायी सत्तेस ठेचून हरील तियेचे प्राण
तेव्हांहि अवश्य द्याल ना तेथून आशिस दान ?

१५-८-४९

# आज बत्तीस शिशिरऋतु लोटले

*"To fall asleep in one's own character is to be in the anteroom of Death."*

— Stendhal

आज...
बत्तीस शिशिर ऋतु लोटले !
...नि शिशिराची शिरशिरी
शहारवी शरीराचा रोमरोम !
सोड, सोड काळे पडदे खिडक्यांवर,
अंधारून येऊं दे,
विटलेल्या विटकरी मेजावर
काळ्या मातीच्या फुलदाणींत
राहूं दे लाल-लाल रंगाचा गुलाब तूं ...
काळ्या खिन्न जगामध्यें
माझ्या तीव्र वासनेची असूं दे एक खूण !

बत्तीस हिवाळ्यांच्या स्मृतींनें
हुडहुडी भरलीसे आत्म्याला !
उजेडाच्या साऱ्या वाटा बंद कर
एकांताची
बसूं दे पांघरून
काळी काळी कांबळी,
लपूं दे उजेडाच्या बोचणाऱ्या उन्हापासून
होऊं दे बंद मला
एकाकिनी स्मृतींच्या
काळ्याभोर कमळांत !

नको लावूं, नको लावूं दिवाहि !
कदाचित्
पिवळ्याजर्द उजेडाच्या कुशींतून
पायघोळ, रोड, काळा
शेवटला शिशिर माझा
बाहेर येईल
काटकुळें लांब बोट
उजेडाच्या पिवळ्याजर्द कुशनवर दाबूनियां
म्हणूं लागेल :
" संपलें...
आतां सारें व्यर्थ आहे...
संपलें ! "

सोड सोड काळे पडदे
उघडें पुस्तक बंद कर.
अंधारांतच, अंधारांतच
मला जुन्या थडग्यांवर
गाल ठेवून निजूं दे
खिन्नतेच्या जहरील्या कैफामध्यें...
नको सांगूं कुणासहि बत्तीसावें संपलें
नि तेहतिसाव्या दरवाजांतून गेलों मी !

बरा मुका अंधकार,
बरी तुझी मौनछाया,
एकाकी...एकाकी...मला
स्मृतींची ऊबदार बरी माया !

नेणिवेच्या काळ्याशार निस्तरंग समुद्रांत
मारूं दे बुडी मला...

खोल...खोल...
पाताळांत...पाताळांत
जेथें हिरवीगर्द अशी बत्तीस हिवाळ्यांची गर्द झाडी
वांकलेली आहे एका आरस्पानी तळ्यावर,
तरंगती पाण्यावर
किती तरी चेहरे !
अनेक विषादयुक्त नयनयुग्मांचीं बिंबें...
भिरभिरतो त्यांच्यावर
एक पक्षी !
झेपावतो...तडफडतो...
झाडीमध्यें आक्रंदतो :
कुहू ऽ कुहू ऽ
कुहू ऽ कुहू ऽ ऽ
त्याची खिन्न माधुरी
फिर्फिरून...
फिरून, फिरून,
कुठें तरी मंद मंद पुकारते
कुहू ऽ कुहू ऽ !...
नि खिट्याळसें, अस्पष्टसें
गोड हास्य, झंकारतें
कुठें तरी
कुठें ऽ तरी ऽ
सळसळते गर्द झाडी हिवाळ्यांची ! !

आर्जवें...
टपटप टपोर अश्रु ...
सळसळतें शहारून येतें गूढ निबिडसें अंतरंग
बत्तीस हिवाळ्यांच्या गर्द हिर्व्या झाडीचें... !

सरसर...सर्सर करी
सळ्सळ, सळ्सळ वाही
खिन्न घों घों खोल ध्वनि करणारा स्मृतिवारा!
तडफडून...
घाबरून,
परतून येतें मन
वर्तमान-मुक्कामावर!

आणि तोंच एक हांक...!
(देई हात!!)
"वर ये रे, वर ये...
आणि ऐक...
तुझ्या झंझावातासम पिपासेची
तुझ्या मस्तकाच्या मागें विलक्षण वेगानें
गर्गरत्या स्वप्नांची पूर्ति
नाहीं स्मृतींतहि तुझिया!
—तूं तर फक्त हात पुढें केला होता!
अंतरींच्या वादळानें मांडला आकांत तरी
तुझ्या डोळियांचा बांध कधीं फुटलेला नव्हता!
...सीमेवरी थबकून
तूं तर फक्त हात पुढें केला होता!!
नाहीं परिपूर्ति
फक्त तहान...तहान,
तुझ्या स्मृतींतहि..."

"—वर ये रे! वर ये!
कधींहि संपूर्ण पानें झाडूनियां
नागवाच झाला नाहीं वृक्ष जो,

टवटवीत लाल-लाल पानांनीं
पांढऱ्याशा फुलांनीं
खचूनियां लवण्याचा काळ त्याचा कोणता ?
कोणत्या वसंताचा केशरी इषारा सांग
त्याच्या जीवनाची करील सुगंधानें सांगता ?
—वर ये रे ! वर ये !!
तुझ्या अंतर्हृदयांत खोलवर
प्रकाशाची तळपती समशेर
गेली नाहीं आरपार
जखमच झाली नाहीं
वेदनांची पराकाष्ठा झाली नाहीं
होऊं दे जखम तुला खोलवर
तीच होईल तुझा सूर्य
तीच बनेल तुझी पूर्ति !"

ओळखीची हांक ही !
प्राणप्रिय, माझ्या व्यक्तित्वाचें सत्य...
दारावर टकटक् करीतसे हळुवार !
स्मृतींची हळुहळू उडे झांपड
फिर्फिरून मित्राची ऐकूं येतसे पुकार...
"होऊं दे जखम तुला !
होऊं दे जखम तुला !"

दोन उंच कड्यांच्या मधोमध
तरंगतें गडद नि गुलाबी पहाटेचें धुकें जसें
जाणीव नि नेणिवेंत तरंगतों तसा मी.

ओढ आली, ओढ खालीं...
काळे पडदे.

उघड खिडक्या
उघड दारें
शिरूं दे वेगानें गर्दी करून
प्रकाशाचा तापलेला झोत आंत
आणि सारें उजाडेल !!
अंधुक नि पुसटशी आजवर तुझी मुद्रा
उजाळेल !!
ठसठशीत, उठावदार दिसेल तीच !
तापलेल्या मुद्रेसम
हृदयावर उमटूं दे
तिचा जळणारा ठसा...

आणि तुझा हात दे
हाडामांसाचा...खराखुरा
वेगानें उडणाऱ्या नाडीचा
भावनेच्या कंपानें
अधिकच निमुळत्या, टोंकदार, कोमलतर अंगुलींचा
हात दे !
धरीन मी घट्ट असा हृदयाशीं !!
...आणि माझ्या दिठीला स्पर्शू दे
तुझें मुख
आणि तयावरची
एक एक अतिशय भावसूक्ष्म
आत्मीय थर्थरती रेषा मला स्पर्शूं दे !
...भावभोळी तुझी दीठ स्नेहाळ
पांघरूं दे अंगभर !
...तुझ्या सहवासाच्या
उमटूं दे

सोनेरी खुणा सुखपीडेच्या
खोलवर हृदयावर
प्रकाशाच्या उजेडांत निःशंक
कडकडून मारूं दे मिठी
आणि जगूं दे तुझें मन...
तुझें जग.

पहा मीं...
माझ्या लांब पाडलेल्या छायेला
गुंडाळून घेतलेलें
आणि एका नगण्यशा थेंबागत
थर्थरत उभा आहें
पुसूनियां जाण्यासाठीं कासावीस
जरी आज
संपलेले बत्तीस... !!

जीवनाचा चौकोन
अर्धा काळा, अर्धा श्वेत
मधोमध छेदणाऱ्या रेषेवर
सतत चाललेलों आहें !
अर्ध्या माझ्या तोंडावर
प्रकाशाचा श्वेत स्रोत
अर्ध्यावर काळी कळा
अर्धा काळा, अर्धा श्वेत
चौकोन छेदणारी
माझी दैवरेषा ती.
माझी गति मधोमध खिळवून धरणारी
माझी भाग्यरेषा ती...!!

एकीकडे
अहंकारभावनेचे, स्मृतींचे
काळे काळे खिन्न ढग !
दुजीकडे
प्रकाशाच्या उफाळत्या, विळखत्या
श्वेत लाटा गर्जणाऱ्या
मधोमध...
हेलकावे घेत आणि डोलकाठीसारखा
उंच जात...
खालीं येत...
बुडत कधीं
(...हॅम्लेट !)
अहो, हॅम्लेट मी !!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 23048 विः ९/८४
क्रमांक 93ee नोंः दिः 29/3/

अर्धा सत्य आणि असत्य अर्धा मी
अर्धा दिव्य आणिक क्षुद्र अर्धा मी
अर्धा सर्वजनजीवनविकलता मी
अर्धा मीपणाचा माज पुरता मी !

दुहेरी मी
स्वतांशीं युद्ध !
दुनिया स्वप्नवत् अंधुक
स्वतांतच बद्ध !
म्हणूनी
जीवनाच्या स्नेहपत्राच्या करी चिंध्या
नि मृत्यूच्या गुहेमाजीं
स्मृती वंध्या
स्मृती वंध्या !!

...भराभर उघड सारीं दारें तूं
खडबडीत, बेडौल, प्रचंडसा एक हात लांबवून
विराट् तो बोलावतो
तडफडूं दे आत्मा हा त्याच्या महाहृदयाशीं
आणि त्याच्या धड्धडीच्या तालावर
माझा प्राण धड्धडूं दे
...आदळूं दे हृदय माझें
विराटाच्या निष्ठुर वास्तवावर!
आणि तशा आक्रांतांत
होऊं दे जखम मला चिरंतन !
जिच्या दाहामध्यें आहे
आसक्ति ! विलक्षण आसक्ति
नि समर्पण ! !
समर्पणापलीकडे
साधीसुधी सर्वांना आत्मसात् करणारी
प्रखरशी युद्धशील माणुसकी ! !
आणि मग...
परिपूर्ति !
आनंद !
उल्हास !
आले पाहा
प्रकाशाचे तळपते शुभ्र पाय
दाराशीं ! !

ओढ खालीं काळे पडदे !
उघड खिडक्या...
उघड दारें...
हातामध्यें हात घाल!

बाहेर ये !
माझ्या प्राणप्रिये, पाहा...

...चांदीसम लखाखतो सूर्यगोल...
विराट तो घुमटहि तरळतो
पांढऱ्याशा ज्वाळांनीं
पेटलेला प्रचंड हा मध्यान्ह !
तयाखालीं लाख शाखा पसरून
आणि शाखाशाखांवर
लाखोलाख कळ्यांचे लाल लाल निखारे फुलवून
उभा एक पळसाचा
निर्मितीच्या वासनेनें उसासता
वसंतबहार ! !
पहा...
चांदीसम लखाखत्या सूर्यगोलावरतीं !
वसंत, वसंत हा...
बत्तीस हिवाळ्यांच्या शेवटीं...!!

२३-१-५२

# मेघ अंधारून येतां

मेघ अंधारून येतां डंवरतें मन
उमटते त्यावर स्मृतिरेषा सोनेरी
वीज लवलवतांना विवश जीवन
कुठें तूं? कुठें तूं? आर्त पुकारी!

मागेंहि अंधारून आले होते घन
जाळींतून तेव्हां दोन तेवले लोचन
मागेंहि लवलव लवली ती वीज
उजळत्या कोन्यामध्यें दिसलें यौवन!

भोळा भाव कधीं नाहीं प्रकट केला
पुसटता मीहि जाणला न जाणला
श्रावणाच्या मेघझडींतील अंधारांत
उसासता कंप हुंगला न हुंगला...

अवचित दूर गेला मधुर वावर
बोल लावी तरंगती रिक्त उदासी
एक तिष्ठलेली साद पाठ फिरवून
मंद विरतांना जणूं हळू स्फुंदली!

अंधुक अंधुक स्मरे चंद्र-कपाळ
आणि धनुकल्यांखालीं तेजाळ डोळे
मंद अंधारांत माझ्या प्रकट होऊन
तळपती सोनरेषा काढून गेले!

मेघ अंधारून येतां डंवरतें मन
उमटते त्यावर-स्मृतिरेषा सोनेरी
वीज लवलवतांना विवश जीवन
कुठें तूं? कुठें तूं? आर्त पुकारी!

३-८-१९५२

# गर्जत गर्जत मंद

गर्जत गर्जत मंद लवून लवून धुंद
आले आले जिवाभावाचे हे प्राणप्रिय मेघ !
सये पहा, चंचलशा नयनांना स्थिर करीं
लखाखेल वीज होइल धरणीला अभिषेक !

गगनांतून कोटि धारा, धुंदावीत दाही दिशा
पर्वतांना झाकूनियां रानोमाळा वर्षतील
सये ! वटवृक्षाच्या हिर्व्यागार झिरपत्या
छायेखालीं उभीं राहूं पाहूं वर्षा वनांतील !

जलधारा तारांवरी फिरेल रुपेरी वीज
गंभीर घुमेल गीत मंद मंद लयींतील
व्याकळून जीव, डोळां भरून येईल पाणी
फोडील तो मोर टाहो हुर्हूरत्या वनांतील !

सोसाट सुटेल वारा वडाची निबिड छाया
दोन विजा लव्लवत्या छायेंत उजाळतील
उडत्या फुलांचा ओला, मादक, सुगंध फेर
धरील नि दोन जीव उसासत भेटतील !

२०-६-१९५२

# गोड निळेपणा

गोड निळेपणा आहे
उंच आकाशांत
गोड मधुरिमा रमे
खिन्नशा मनांत

तलावाच्या निळ्या लाटांवर
हसें ऊन
मनसोक्त हसावेंसें
वाटे कीं मधून!

आकाशांत तरतात
हंस पांढरे
मनामध्यें नव्यानेंच
कुणी वावरे!

कधी मनांतली जखम
दुखे पण गोड
फिक्या दुपारीं बसून
जुन्या नावा सोड!

४-२-१९५०

# खरें आहे

खरें आहे उगीचच केला कांगावा
मनांमध्यें झुरणारा ठेवून रावा
आतां हातामध्यें हात गुलाबी घेऊन
आंसवांतून एकमेकां बघूं निरखून!

१२-३-१९५०

# आतां

आतां आतां जरा कोठें तळठाव दिसे
आतां आतां जरा कोठें मुखावरी हसें
आतां जरा जरा लय लागूं लागली
तोल सांभाळीत येई बात मनांतली !

व्यथेवरी पाणी आतां चढे आगळें
आतां एकटें ना वाटे जगावेगळें
आतां क्रोध थंड पावलांनीं सरे पुढें
पोलादी मुठींत सर्प उभा वळवळे !

आतां पाय लागलेत जमिनीवरी
मातीच तियेची आतां माझी चिंता करी !
पीडेंतून प्रेमाचे हे पाझरती झरे
कृतज्ञ मी डोकें लववितों भूमीवरी

काळजीभ माझी ज्योत चाटील ना चिंता !
माझेंपण मर्त्य, तिची अमर अहमूता
मातींतून पणत्या मी करीत राहीन
आयुष्याची काडवात जळती राखीन !

२१-१०-१९५४

# मराठीचिये नगरीं

शब्दांमाजीं दडलेली
कोटि कोटि व्हॉल्टस्‌ची
असे जीवनाची वीज
तिचा स्फोट करायास
जाग, जाग महाकवे !
सोड, सोड आतां नीज.

थर्थरत उभा आहे
जागच्या जागीं काळ
छाती धड्धडते आहे
हिमालयाचीहि आज
अगणित मंद डोळे
विस्फारुन रात पाही
हृदयांच्या अणूंतहि
नवसूर्य-स्फोट आज.

दोन कडाडत्या विजा
विलक्षण वेगवान
आदळून छिन्न होती
अशा नग्न संघर्षास
पाहतांना डोळे जाती
जीव छिन्नभिन्न होती...
अथवा...अभिन्न होती !

हीच वीज
जाणीवेच्या पीडेची ही वेलांटी

विलक्षण ओढ घेते
अब्जावधींमधूनिया
एक लाट वाहवीते
एक वाट चालवीते !

लाखोंलाख वर्षांच्या
इतिहासवाटेवर
अंधारास छेदूनिया
पुढें पुढें धांवणारा
मानवाच्या प्रज्ञेचा...
प्रकाशाचा बाण हीच
दावीतसे गुप्त वीज !

वाहतसे आज तीच
डोळे पांढरे करून
फेंसाळल्या तोंडाच्या
अष्टावक्र तनूंतून
वातीगत हातांतून
मांड्यांतून, पाठींतून...

नाडी महावेगें उडे
आज मनोमनांतून
आज जनाजनांतून
उन्मत्त उद्दाम ओघ
वहावया लागे वेगें
आक्रसून
गांठीगोळा बनलेल्या
जीवांतून...

स्थितीचे
थरांवरी थर फक्त
शिलीभूत जडीभूत
दिसतात
मेलेल्या नजरेला
कोण पाही तळींच्या
कासावीस
आकांतानें झुंजत्या
निकरानें लढत्या
तडफत्या गतीला ?

शब्द, शब्द, शब्द फक्त !
बोल किती फोल आज
हृदयांस दूर दूर राखायास
शब्दा चढे मोल फार !
स्वप्न आणि वास्तवांत
कृती आणि आदर्शांत
बोल आणि भावनेंत
शिरे शब्द-पाचर !

शब्द, शब्द, शब्द नी
शब्दांचा पडे ढीग
शब्द मोठे अन् लहान
दुमदुमते, घणघणते,
ऐसपैस, अगडबंब,
नखरेल, ऐटबाज
—हवे तसे !
खास शब्दटांकसाळ
चाले सदा सर्वकाळ

आशयाच्या पेढींतील
कधींचें खलास सोनें
मवाल्याच्या राज्यांतील
शब्दांची चलनवाढ
भ्रांतचित्त !
सारे होती हतबुद्ध !
कसें दिसणार त्यांना
गतियुद्ध ?

घरोघरीं सूर्य परि
एल्यूमेनियमचे सर्व
अंधकार पायघोळ
फिरे स्वैर...
सर्सरते
काळी धूळ इच्छेची
वासनेचे हिर्वे सर्प
बिळाबिळांतून निघून
सर्पटती, शेवाळल्या भिंतींवर... !

क्षयी मंद दिवा जळे
मन आंत आंत गळे
बळें बळें जगतांना
जीव कसा तळमळे !

विझू विझू दिव्याची
भुताटकी !
त्यांत दिसे क्षयी सून
पोळपाटावरी लाटे

कणीक...
(जी नसे तेथें!)
तवा मात्र लाल लाल
समोरच वाट पाहे
कोण जाणे कवींचा
कोणी एक
(छाया जशी)
गंहिवर कोरडाच
दाबीतसे आंत आंत
काढीतसे मातीमध्यें रेघोट्या !!
भाग्याच्या ?

आणि येथें तेथें कोठें
अंधाराच्या सांदीमध्यें
द्वेषानें हिडिस्स तोंडें
हिस्‌काहिसक करतात
जीवनाच्या प्रेताशीं
मैथुनाचें सुख घ्याया
झगडती आपसांत
मिळालेल्या कोपऱ्यांत
कवड्यांचे डोळे त्यांचे
त्यांना कसा दिसणार
चिरडल्या इच्छेचा
बीभत्स हा अवतार ?

अर्धा नर
अर्धा पशु
अजस्रसा ऑक्टोपस-खेकडा !
लांब लांब नखांचा सत्ता-दैत्य

अनेक कवेंती पाय
धर्म आणि संस्कृतीचे
कला आणि विचारांचे
वेढतात सारें जग
आठी दिशा
आणि त्याच्या धुडाखालीं
पिचताती, वळवळती
नरनारी...

जीवनाच्या ऐन उष्ण
गाभ्यामध्यें आंत आंत
धडधडत्या काळजांत
थेट खुपसून दांत
रक्त पितो संथपणें
अर्धा नर
अर्धा पशु
सत्ता-दैत्य
सारें जग त्याचें भृत्य !
माथ्यावर एक डोळा
ळळ्ळळता
रक्त पितां पितां त्यांत
आंसवें होतात गोळा
'पावन हा पश्चात्ताप'
करी संत-महात्म्यांच्या
हृदयांचें पाणी पाणी
विराटशी लाभे दृष्टि (!)

कशी कळणार अशा
अज्ञ सर्वज्ञांस सांगा

निर्घृण बलाढ्य अशी
लढाऊ चैतन्यसृष्टि ?

...खुल्या बाजारांत हो
मानवाच्या हृदयांत
सदोदित राहणारी
सुकुमार बाळ ती
(—तुझी माझी लाज ती—)
विटंबून बीभत्स
फांसून डांबर काळें
धिंड तिची काढलेली
खुषमस्कऱ्या मर्कटांनीं
संधिसाधू हलकटांनीं
इजारींत
कोमलसे त्यांचे हात !

ढळढळां रडते ती
भिरीभिरी बघते ती
थवे थवे ऐकतात
लाचारीच्या धुरोळ्यांत
ठिगळ्दार पाट्लोणी
घातलेले
ज्वरामुळें कांपणारे
काळे रोड चष्मेवाले
पाहतात !...
(पाहतात ! !)

हृदयींच्या भेगांतून
गळणारें रक्त म्हणे :

"जीवनाच्या पिळांतून
आग निथळेल का ?
रुपयाच्या संस्कृतीचा
पाया वितळेल का ?"

आणि माझी माय ती !
किती कासावीस मन
युगें युगें सांचलेलें
तिच्या हृदयांत रडें
सुरकुतल्या गालांवर
खोल खोल चरे तिच्या
खांद्यावर, माथ्यावर
झेललेलें तिनें ऊन
वाकूनियां छाया केली
आम्हांवर
केस तिचे रुईचेच पुंजके
मंद तिची दीठ, तींत
प्राचीन ते व्यथेचे खोल डोह
अशी माझी महोदार माय हो
आशीर्वादछत्र तिनें धरलेलें
थर्थरतें आम्हावरी
विवंचना तिला एक:
"कसें होईल
पोटींच्या या गोळ्यांचें ?
पोरें हीं
मोतीचुरा उगवून
पोटीं कांटे भरतात !
कारखाने धड्कवून

रक्त थुंकीत मरतात!
यांची तनू पिळूनियां
त्याचे ओठ लाल लाल
यांच्या डोळ्यांतील तारे भरडून
त्याच्या शहरीं लखलखाट!!"

सत्तेच्या पहाडी चाकाखालीं
गेलों चिरडून
आमच्या रक्तांची आणि
फर्फटत आलेली लाल लाल एक रेघ
काळाच्या मैदानावर!
(हाच इतिहास फक्त आमचा!)

परी
मानवाचा हा मनःपिंड
महान् आश्चर्य आहे
निर्मितीचीं निजलेलीं
अनंत जीं जगें त्यांत
आणि त्यांना जागविणें
प्रगतीचा अर्थ आहे!
जीवनाचा महावृक्ष
एक एक डहाळ त्याची
व्यक्तित्वसंपूर्ण आहे!

व्यक्तित्वाच्या डहाळींत
सळसळतें
आकांतसंगीत एक!
निर्मितीच्या स्फोटांतून
सृजनाचीं पानें लाल

अनंत फुलांनीं शुभ्र
खचून नि डंवरून
वांकून विनत होते
व्यक्तित्व-डहाळ
तींत
जीवनाच्या गाभ्यांतील
सौंदर्याचें मर्म आहे
हाच एक जीवनाचा
सनातन धर्म आहे !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ८४०५
ग्रंथ शाखा (स्वतंत्र प्रत)

आणि आई
हाच नित्यनूतन
सृजनशील मनःपिंड.
असे आम्हांमध्येंहि
आमच्या गे प्रेमाचें, दयेचें, करुणेचें,
सौंदर्याच्या कांक्षेचें,
सृजनाच्या ऊर्मीचें
ठेंचून कुटून झालें आजवर
असें द्रव्य
(भयंकर !)
मिसळून त्यांत द्रव
जळजळीत आजच्या व्यथेचे
जालीम तेजाब तें
जीवनाच्या ताटलींत
भुकेच्यिा ज्वाळेवर
उकळतें रसायन
बनवी जें
प्रत्येकाच्या व्यक्तित्वास

महास्फोट करणारा एक बॉंब !
आई तुझ्या दीन हीन
दुर्मुखल्या जनतेच्या
सागराचा कण न् कण
बॉंबच एकेक आहे!
नाहीं दिसणार ज्याला
ठरणार गुन्हेगार
तोच उद्यां !!

आणि माझा प्रतापी पिता सूर्य !
त्रैलोक्याचा करी दाह
रुपेरी ज्वाळेच्या किरणांनीं तीक्ष्णशा
नाहतसे त्यांत माय धरित्री
पुन्हा पुन्हा यौवनवती होतसे
कृष्णकमळांतली श्यामकांत सुंदरी

आणि माझा प्रतापी पिता सूर्य
(प्राणशक्ति जगाची)
किरणांच्या शलाकांस वरसून
...शरीराचा
कण न् कण भेदून
काळासार छेदून
रुधिराच्या बिंदुबिंदुमध्यें क्षुब्ध
निर्मीतसे
विक्षुब्ध, उन्मत्त
संगीताचा कल्लोळ !!

प्रकाशाचा तीक्ष्ण तीर
छाती पार फोडून

मधुमय प्रहारानें अकस्मात
काळजाचा काळा पिंड दुभंगे
उगवती ज्वाळा-कळे
विकासती
विकासून फुल्ल होती
भावनेचे लाल लाल गुलाब ते
(वासनेच्या रुधिराच्या अतिरेकें
अधिकच आरक्त !!)

धरणीची...
(जीवनाच्या वासनेची)
पेटलेली विराटशी ज्योत एक
लाट घेत, लहरत,
उंच उंच उंचावत
चाललेली आकाशांत
आदर्शाच्या मानवीय सूर्याकडे
ज्वालेचे करतल लाल लाल
पसरून वेगानें !

तोच सूर्य
नाशाच्या धूर-धुक्यामध्यें दाट
दिसेनासा झालेला
नव्हतासा झालेला

यंत्र-दैत्य-सम्राटाचें
पसरलें साम्राज्य !
तयारींत जय्यत
रणगाडे चिलखती

संगिनींची धांवे लाट
लाखोंचें हाले दळ
अंधारांत उड्डाण मारतात
विमानांचे घर्घरते ताफे लाख
पोलादी युद्धटोप
घातलेला कुर्वाळतो अणुबाँब प्रेमानें...
समाधानें हासतो नि
गड्गडती काळे ढग !
खिळे खिळे दिसतात
दांतांचे
आढ्यतेनें म्हणतसे :

"काळ्या काळ्या पाठींवर
आसूड मी ओढणार
कधींचाच पुरलेला
काळोखांत सूर्य मी !!"

बघूनि ही हिंस्र शक्ति
निराशेचे मंत्रद्रष्टे
देती मंत्र मृत्यूचा—

"बुद्धि फसवून आणी
ज्ञान-माया-नगरींत
तेथें भोळा सदा फसे
आणि घडे विपरीत
अर्थ बांधी हातपाय
नीति तोंड शिवीतसे !
आशा, आशा लावूनियां
उभ्या उभ्या जाळीतसे !

जीवन? ही मृत्यूची
आहे छाया लांब फक्त!!
सूर्य? दंतकथा एक
श्वासोच्छ्वासाचें निमित्त!
राम नाम सत्त है
सत्त बोलो गत्त है!!"

परी
एक गर्जना
दुमदुमते दिगंतीं :
"खोटा आहे दावा हा
खोटा मृत्युमंत्रहि
आम्ही मॉस्को-कीव्हच्या
व्होल्गा-डॉनकांठच्या
अजरबैजान, तुर्कोमान देशाच्या
साध्यासुध्या दणकट लोखंडी हातांनीं
संघशक्तिघणानें
बलाढ्य प्रहार केला
ठेचूनियां काढला
हाच दैत्य
उपटून तयाचे
नखाळ कर्वती पाय
तुकडेतुकडे करूनियां फेकले
बाल्टिक नी कॅस्पियन सागरांत
आणि आतां लखाखतो
साम्यसूर्य
त्याच्या तळीं विकासतो
श्रमाचा गुलाब लाल!!"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि: ...

गर्जनाहि तीच उठे पूर्वेला!
महावेगें पहाडांचा
चुराचुरा करणाऱ्या
हो हेंग हो नि यांगत्सीकांठचे
बहाद्दर!
अभाळाला भिडणाऱ्या पेकिंगचे
महावीर
गर्जूनियां सांगतात:

"आम्ही भोळे चीनचे शेतकरी!
आम्ही साधे चीनचे कामकरी!
घामामध्यें भिजवून
भाकर ती खातांना
पाठीवर होता पाऊस
बुटांचा
उन्हामध्यें राबवून
उरीं फुटतांनाहि
आसुडाचा मार होता
रोजचा!

आम्हीच ते
ऐक्यभावनेची वीज अनुभवून
चवताळून उठतांच
सत्तादैत्य-नाकाडावर
वज्रमूठ हाणली!
पळतांना भुई त्याला
थोडी केली
जनशक्ति जाणली!!

हुश्शार रे! आशियाचे क्रांतिकारी लोक हो!
पूर्वेला उभा सूर्य तुम्हां हांका मारतो!
दिसे ना तो ज्यांना, त्यांना उपटून फेका दूर
मृत्यु त्यांच्या मदतीनें तुम्हां ठार मारतो!"

नखशिखांत पेटतात अरण्यें तीं
तेलंगणा-मलायाचीं
उत्तर-दक्षिण आफ्रिकेचीं

उठतात नरनारी
(मृत्यूला भय भारी)
गर्जना करीत येती—
"करूं आतां स्वाहाकार
करूं आतां स्वाहाकार
शोषणाच्या सत्तेचा!"

कळी एक जन्मतांच
शिशिराचा सर्व कावा होतो नष्ट
किरणांचा तंतु एक दिसतांच
अंधाराचा पराजय होतो स्पष्ट
हिसका एक विद्रोहाचा बसतांच
मृत्यूला मरणाचे होती कष्ट
साक्षात् समोरच दिसे त्याला
साम्राज्य होतांना नष्टभ्रष्ट!

—कारण अमर आहे
सृजनेच्छा धरणीची
कारण अखंड आहे
सूर्याकडे धांव तिची

परी आज...
सौंदर्याच्या कानाशीं
बंदुकीची नळी आहे
जीवनाच्या माथ्यावर
लटकता बॉंब आहे!!

होईल का सर्वनाश?
जन्मेल का नवा स्वर्ग?

सत्तादैत्यराज आज
वेडाच्या लहरींत
टाकील का अणुबॉंब?
होईल का
हिरोशिमा
नागासाकी?

कुटुंबेंच्या कुटुंब
मांसमज्जा बनूनियां लोंबतील
जळलेल्या झाडांवर?

भाकर ती खाणारी
बाळगोपाळ मंडळी
भडाभड रक्त ओकीत
मरणार!

तोंडांतला घास उरेल
जळलेल्या तोंडांतच?

प्रेमाचा वर्षाव करणारा
प्रियेचा एक डोळा
लोंबणार गालावर?
दुजा डोळा एक छिद्र?

त्वचा पूर्ण जळूनियां
भाजलेल्या डुकरागत
नेत्रहीन देहाचा उरणार
राखेचा पुतळा एक!
रक्ताच्या जागीं पू!!

उरेल का जग एक
राखेचा ढीग फक्त??
हाय! हाय! हाय, हाय!!
करीत बडवीत छाती
ढिगावर बसलेली
पांढऱ्या केसांची
नि जळक्या देहाची
बोळकेल्या तोंडाची
जक्ख एक म्हातारी
उरेल का?
मानवाच्या
अस्तित्वाची हीच खूण?

आज काळरात्र आहे
सर्वनाश अथवा स्वर्ग!!

हाच प्रश्न
विजेचा हाच बाण
करी जागा...
उशाशीं घेऊनियां चीनला
आफ्रिका नि मेक्सीकोच्या
मैदानांत
पसरून पाय दूर
सहस्रशीर्षः पुरुषः
सहस्र हातांचा
सहस्र पायांचा
पोलादी छातीचा
मृत्युंजय !

भयंकर जुंपे युद्ध
नाशाशीं जीवनाचें
मृत्यूशीं चैतन्याचें
शोषणाच्या क्रूर पशुदैत्यांशीं
जागृतीनें भडकल्या जनशिवशक्तीचें !

...आणि उद्यां
आडसर तुटूनियां
फोफावत उफाळून धांवतील
बाहेर
दडपल्या साऱ्या शक्ति !
युगाचा बॉयलर फुटूनियां
स्फोट होईल
कोलमडून पडतील उंच उंच धरणें
सृजनाचा महानद

भरुनियां टाकील
सारें विश्व
ओतप्रोत!

आणि उद्यां
स्कायस्क्रेपर गद्गदां हालतील
उताणे पडतील
फुटतील किंकाळ्या
खिडक्याखिडक्यांतून सर्व
तोंडाचें रंगरोगण निघूनियां
नासक्या रक्तावर पोसलेली
फोपशी नि हिडिस्सशी
संस्कृती
वेडामध्यें बरळत घेईल उडी
हस्तिदंती मनोऱ्यांतून
खालतीं.
शिडकाव अपावन रक्ताचा ! !

खांद्याशीं खांदा लावून
जनतेचे वेगवान नवे ओघ
महापुरासम वेगें वाहतील
सळाळत बळावत...

श्रमाच्या सौंदर्यानें
काव्यानें...
प्रेमनियमानें सारे
परस्परां भेटतील
एक होतील !

मुसमुसतील
तारुण्यानें
सदोदित भावना.
नील नील आकाशांत
सदा टवटवीत दिसेल
कल्पनेची लाल लाल
मांसलशी पालवी.

आवेगें आलिंगील
तळपता तरुण तो
तरुणीस !
खांद्यावर
बाळाला उसवून
आनंदानें दूरवर दाखवील
उद्यांचें दृश्य पिता !

हातामध्यें झेंडा ताठ
मान ताठ
पाठीचा कणा ताठ
निर्भय दृष्टीचा
पायाखालीं डळमळती पृथ्वी नि
कोसळून पडणारें सारें जग
डोकें घाशी पायावर !
अलौकिक नवा थाट
पराक्रमी मानवाचा.

परी आज...
युग दुभंगतें आहे,
सत्य प्रसवतें आहे

कळांनीं कहर केला
तरी गुप्त आशा त्यांत
सुखें व्याकूळते आहे !

कोण अश्रू झराझरा
ढाळीत बघेल हें ?
मरूनियां लाखदां
जळतें जगेल हें ?

आगीच्या साउलींत
गाइल कोण धीराचें ?
नाशाच्या रातव्यांत
आशा-सोनफुलांचें ?

कोणाच्या हृदयीं
गहिंवर युगाचा ?
कोणाच्या जीवनीं
फुलोर अग्नीचा ?

मी तर खचित नव्हें
माझी मनज्योत मेली
भावनेच्या गंधकाची
आग आग उरलेली
खरा खुरा त्रिशंकू मी
लोंबणारा अधांत्रीं
मन आंत ढांसळून
पोखरली खात्री !

मनीं तड्फडतें परी
घायाळ इमान माझें
पीडेचा कांटाच ठेवी
जीवन जिवंत माझें

अंधारी अधांत्री खोली
भिंतीवरी मला दिसे
विश्वप्रतिबिंब स्पष्ट !!
कठोर हें युगद्वंद्व
जीवनाच्या प्रवाहाचा
महापूर,
कल्लोळ, धबधबे
नि जळचक्र !
मानवाच्या उत्थान नि पतनाचे
मृत्यूंतून तगण्याच्या मर्माचे
चैतन्याचे आलेख !!
माझ्या खोलीमध्यें दिसे
विश्वाचें हें प्रतिबिंब
सुस्पष्ट !

परी कोठें
पाऱ्यासम थर्थरतें
विजेसम सळ्सळतें
जिवंत नि विकासतें वास्तव
कोठें त्याचें प्रतिबिंब !!

कोठें माझे
मागेंपुढें पाहणारे

जपूनियां चाल्णारे
चांचरते चार शब्द !
कोठें युगवाणीची
अजस्र प्रभावी शक्ति !

एक क्षण...
एका क्षणामध्यें घडे
युगांचा इतिहास.
यातना...
यातनेच्या पोटामध्यें
गर्गरतो
मूर्तिमंत विश्वास.
तोच आज
मागतसे महाकवि
माणसांतला रवि !!

येई येई महाकवे !
अश्रद्धेच्या भेगांनीं फाटूनियां गेलें मन
तुझ्या गीतचंदनानें त्याला नवा धीर दे !
भावनेच्या वेलीहि सुकूनियां पडलेल्या
त्यांच्या नसांतून रस सळाळून वाहूं दे.

माना खालीं पडलेल्या, डोळे मंद थिजलेले
मोडलेला कणा आणि फोल झाले वायदे
माना त्यांच्या कर वर, तळपूं दे नवे डोळे
ताठ कणा करण्यास विजेचा संचार दे.

कचेऱ्यांच्या कप्प्यांतून, गिरण्यांच्या पोटांतून
खाणींच्या आंतड्यांत, जहाजांच्या धक्क्यांवर
धरणीला बिलगून चिकटून बसलेल्या
खुरटल्या, वाळलेल्या, लुटलेल्या शेतांवर
उभा आहे घामाघूम विश्व-शिल्पी आजचा
मुठींतील धूळ रित्या नजरेनें न्याहाळीत
मातीच्या गर्भांतील बेचैनशा बीजासम
ठणकत्या आत्म्याची व्यथा उरीं सांभाळीत.

वाचा दे या रहस्याला, वर्धमान सत्याला
धडकूं दे तुझा ऊर त्याच्या आत्मतालावर
घरोघरीं, रस्तोरस्तीं, हॉटेलांत, पुलावर,
गांवोगांव पसरूं दे, तुझें गीत अनावर.

मृत पुत्र कवटाळीत बसलेल्या वृद्ध माता
क्षयी सुना कोरड्या डोळ्यांनिशीं पाहतात
पोरक्या त्या बाळांच्या सांपळ्यांना उकिडर्यांत
कण कण शोधतांना कावळेहि मारतात.

उद्यांच्या वतीनें तूं मातांना त्या धीर दे
सुनेच्या अश्रूंसाठीं ममतेचें गीत गा
बाळांची वाताहत जाणवून, हेलावून
पेटतील सारे जण असें ज्वालागीत गा!
गाणें हवें त्वेषाचें, वैषम्याच्या द्वेषाचें,
गळून गळून स्वत्व मरणाच्या सुडाचें;
गाणें अपमानाचें, विंचवाच्या दंशाचें,
अहोरात्र छळणाऱ्या पिशाच्चिनी स्मृतींचें.

गाणें हवें बंडाचें, साखळदंडाचें,
भयंकर छळाचें, छळांतहि बळाचें,
गाणें गुप्त त्यागाचें, अज्ञात शौर्याचें,
अतिकोमल मनांच्या कणखर कृतींचें.

ज्वालेवर हात ठेवून घेतलेल्या शपथेचें
पराजयांतून नव्या संकल्पांच्या गतीचें !

गाणें अंदमानाचें, अंदमान-भिंतींचें
भिंतींचिया दगडांना आलेल्या कढांचें
फळ्यावर नागव्या त्या बांधलेल्या मुलाचें
आसुडाच्या मारालागीं 'जय जय' उत्तराचें.

गाणें जाड दणकट लोखंडाच्या हातांचें
वाळलेल्या जर्जरशा थकलेल्या हातांचें
घण मारणाऱ्या, धान्य कापणाऱ्या हातांचें
पृथ्वी उचलून धरणाऱ्या दोन हातांचें.

येई येई महाकवे, आज मुक्त कंठानें
अन्नसागराचें, प्रेमसरितांचें गीत गा !
प्रत्येकाच्या हृदयाला स्वतःचेंच गूज वाटे
असें मर्मस्पर्शी आणि सर्वस्पर्शी गीत गा !

गीत साधें कोमलसें, हृदयाला खुलवीलसें
प्रेमाचा उचंबळ अनावर होईलसें गीत गा !
निर्मितीच्या अंकुरांना मोकळीक मिळूनियां
जीवनाच्या फोफावत्या बागेचें तूं गीत गा !

गीत लडिवाळ भोळें, गळीं गळा घालील जें
पाठीवर ममतेच्या स्पर्शाचें तूं गीत गा!
गीत सर्व संवादाचें, विकासत्या कमळाचें
चेतनेच्या मृत्युंजय धाडसाचें गीत गा!

गीत गा तूं नारीचें, पत्नीचें, भगिनीचें,
विश्व-जननीचें आणि प्रेयसीचें गीत गा!

युगें युगें कुंठितेचें, पीडितेचें, शोषितेचें,
यातनेच्या जगीं प्रेम-सौंदर्याचें गीत गा!

गीत सहनशीलेचें, साक्षात् क्षमेचें
जीवा बिलगत्या वीज-वेलीचें तूं गीत गा!
व्यथेचिया साजणीचें, समर्पणशक्तीचें
करुणेचें, विरहाचें, तिच्या तीव्र कळांचें तूं गीत गा!

तळपत्या मातेचें, दूधपित्या गुलाबी आशेचें
साम्यसूर्याखालीं नव्या प्रजेच्या विकासाचें गीत गा!

गाणें हवें जिव्हाळ्याचें, अनावर उमाळ्याचें
गहिंवर दाटूनियां येईलसें खरेंखुरें गीत गा!
निर्मितीच्या आनंदाचें, जीवनाच्या स्वानंदाचें
साम्य-मन्वंतराच्या गुलाबी पहांटेचें गीत गा!

शब्दां फुटो अर्थ
आणि मनांतून प्रकाशाचा फुटो स्रोत
गळो भेदभाव
आणि श्रमाचें काव्य करो जीवनास ओतप्रोत

झडो विद्रूपता सारी
शुभ्र गौर सौंदर्याची निघो स्निग्ध सत्य-ज्योत
फुटो महावृक्षाला
कोट्यवधि पानेंफुलें
मानवाच्या विकासाचा अबाधित वाहो स्रोत!

महाकवे
जसे ढग
पृथ्वी-गोलकामधून
उंच उंच आकाशांत उडतात
तसे
जीवनाच्या सूक्ष्म कणाकणांतून
तुझे भाव-मेघ
युग-गगनास घेरून
घनघोर बोलूनियां
झुकतात!

दिसे सारें मला स्पष्ट
सांग कोठें आहे तूं
सारी मानवता आज निकरीं
आळवून आळवून
बोलावते तुला आहे
ज्ञानेशाच्या तुक्याच्या
मराठीच्यिये नगरीं.

११-५-१९५२

# आले कवि पाहुणे

आले कवि पाहुणे
जिवाभावाचें भेटणें

अशी रंगली मैफल
झाली रसबरसात
सारें वितळून जग
फक्त उरलें दोघांत
एकमेकांतून
पूर्ण विश्व आलिंगिणें
आले कवि पाहुणे

अशी झाली भावभेटी
सारीं वर्तुळें फिटलीं
एका लाटेची उन्मत्त
धुंद जाणीव उरली
अशा जाणीवेस
फुटे लयींत बोलणें
आले कवि पाहुणे

सारें एकतान झालें
उभी जगव्यथा डोले
माझ्या करोडों भावांची
मूक कहाणीच बोले
अशा कहाणीनें
पृथ्वी-आभाळ भेटणें
आले कवि पाहुणे

होती पायाशीं खिळली
वर झाली तीच दीठ
साऱ्या भावना चेतून
माझें सत्य बने धीट
रात्र दुभंगून
दीप्त सत्यानें फांकणें
आले कवि पाहुणे

आले कवि पाहुणे
अश्रू झाले गोळा
दोन मनुजांच्या भेटी
किती अपूर्व सोहळा
अशा सोहळ्यानें
सारीं मनें उजाळणें
आले कवि पाहुणे

१६-८-१९५३

# बिचारे

बिचारे!
काटकुळ्या मनगटांवर
घड्याळें बांधून आले
डगमगत येथवर
जवानीच्या दाराशीं
शृंगाराची स्वस्त पट्टी चघळीत
बुजलेल्या मनामध्यें
दर्शनाच्या धाडसी कल्पनेनें थरथरत!!

गोठलेल्या डोळ्यांतून
रसीले इशारे देत!

आणि हेहि—
यांचेपाशीं मत्ता आहे
एका खिशांत सत्य
आणि दुज्या खिशांत सत्ता आहे!
मृदु स्मित निथळतें अगत्याचें!
गोड गोड स्मित घ्या
थोडें थोडें सत्य घ्या
सुतक्यांनो, हसा जरा
संस्कृतीच्या अत्तराचे फवे घ्या!
नमस्ते राजे हो
मानवते, नमस्ते!!

आणि तेहि—
उभे रहा बाहेरच
नका दाबूं तावदानावर नाकें
नका पाहूं असे आंत
खुळ्यांनो, महामानव आहेत तेथें!
आत्म्याचा आविष्कार
व्यक्तित्व कीं कायसेंसें...
तुम्हांला कळणार कसें?

ऐका... ऐका...
डाडाइझम, सररियालिझम
अमुक इझम, तमुक इझम
झाली आहे खोल जखम
प्रत्येकाला
जखमेंतून कविता
नि कवितेंतून 'वाहवा'
—खुर्चीखुर्चींतून 'वाहवा'!

होय बाई
तूंहि प्रियतमाच
तुझ्या धन्याची तूं सुंदरीच!!
(विकायला आहे कांहीं तुझ्यापाशीं?)
रोज सरे फाटकाशीं तुझा धनी
बाळाचें फुगे पोट पिऊन पाणी
(तुझा देह?
मूठभर धान्य नाहीं देणार कुणी!!)

...तुला पाहून कविता
कवितेंतून क्रांति
लाख कविता,
लाख क्रांत्या
तरी तुझ्या गहिंवराची पाणथरी
दुखेलच, दुखेलच !

तुझी इच्छा,
चुलीच्या मंद नि गुलाबी उजेडांत
धन्याला नि बाळाला समोर बसवून
वाढावी थाळीमध्यें
खरपूस शेकलेली खमंगशी
तपकिरी भाकरी.
पण...
आपला शुक्रवार तलाव खूप खोल आहे
सुखरूप जाशील सहकुटुंब तळाशीं
आणि ते
जगतील शंभर वर्षें
नुसत्या फलाहारावर !

सत्य काय ?
ब्रह्म कीं भाकरी ?
भाकरीचें ब्रह्म ?
कीं ब्रह्माची भाकरी ?
भाकरी ? छे ... छे ...
भाकरीनें रक्त नाहीं सळसळत
डोळे नाहीं लखलखत
चुलीपाशीं गुलाबी उजेडांत
निचिंतीच्या कहाण्यांना नाहीं चढत रंगत

छे ... छे ...
सत्य नि सौंदर्य नाहीं,
आत्मा नाहीं, ब्रह्म नाहीं भाकरींत
ब्रह्म माग, ब्रह्म जग
साऱ्यांनाच जगूं दे
सुखानें खंगूं दे तुझ्यासाठीं.
भाकरीचा सोड नाद
तोच खरा अधःपात!

भोगणारे निराळे
बोलणारे निराळे
पेरणारे निराळे
पळविणारे निराळे
जळणारे निराळे
विव्हळणारे निराळे
ऋषीमुनींच्या देशामाजीं
कर्मभोग निरनिराळे!

पाहा त्यांच्या गळ्यामध्यें
कला आणि संस्कृतीच्या सुंदरींची
लडिवाळ मिठी आहे
ज्ञान आणि विज्ञानाचे
खानसामे
गणवेश घालूनियां दिमतीला ट्रे घेऊन
उभे आहेत
अदबीनें पाय चेपी साक्षात् ब्रह्म तें!
फेडा फेडा डोळियांचें पारणें
पाहा आणि ब्रह्माचें
सगुण रूप...!!

आणि तेहि बिचारेच !
हॉटेलांच्या अंधारांत
हिव्यां, पिवळ्या, लालभडक
टेबलांच्या सभोंवार
वृत्तपत्राआडून
सिगारेटच्या धुरांतून
जळजळीत शब्दांचे लखलखतात
जंबिये
हमरीतुमरी, वादावादी,
धुमश्चक्री ! !
केवळ तुझ्यासाठीं !
केवळ तुझ्यासाठीं !

आणखी... कोण तो ?
तो तर मीच !
त्यांच्यांतच दिसतों आहें... !
त्यांच्यांतच हसतों आहें ! !
माफ करूं नको मला
माझ्या खातेवहीमध्यें आहे
जमा नांवें मिळून एक
भलें थोरलें शून्य... ! !

नको करूं माफ
काळोखाच्या चैतन्याच्या देवा तूं
उद्यां तुझ्या दोन बोटांच्या चिमटीमध्यें
सारेच तडफडतील, फडफडतील
बिचारे ! !

११-१०-१९५३

# आम्ही

अम्हि लक्ष्यहीन, अश्रद्ध, सुटे
पांघरूण कुठल्याही स्वप्नाचें
पडे सदा आम्हांस थिटें
अम्हि लक्ष्यहीन, अश्रद्ध, सुटे !

अम्हि सर्व वर्तुळें
अहंकारकेंद्राच्या भंवतीं गरगरणारीं
निळाजांभळा विषप्रकाश पसरविणारीं
परस्परांना छेदित छेदित जगणारीं
अम्हि सर्व वर्तुळें !

हृदयीं ज्योती...होत्या !
त्या मालवल्या !
अतां मात्र राखेवरतीं
धूड स्वतांचें पसरून देउन
अजगर निर्वाणाचा बसलेला
काळेभोर परमनिराशेचे डोळे काढुन !

परस्परांवर भुंवया चढुनी...
(— स्वतांचाच तिटकारा !)
ओठांवर कुत्सा विकृत
(— जणुं उगिच पसारा सारा !!)
आणिक मरणाच्या काळ्या आगीनें
हळुहळु झडणारा अमुचा चेहरा !
बघतांच शहारा
अन् शरिरावर बसतो फटकारा !

हाडीं खिळलेला आत्मनाशज्वर
निळ्या निळ्या जिभल्यांनीं शोषितसे
धमन्यांतिल सृजनशक्ति असलेलें
चमकतें लाल लाल शुद्ध रक्त ! !
आणि त्याच यातनेंत झिंगुनियां
शून्यपणें बघतों अम्हि
शेजारुन भरभर जाणारीं
शुभ्र पाउलें !
हें नच पापविमोचन
हें तर आत्महनन ! !

•

जळणारे तळवे पायांचे
मातीच्या अंधाऱ्या गाभ्यांतिल
ऊर्जेमधिं रोवा !
धांवत जाऊं द्या
सळसळते गार झरे
पायांना करित थंड
ओळखा नि
मातीच्या काळ्या पिंडाला
फोडुनि निघणारें हिरवें रहस्य

शमुं द्या ज्वर
शमुं द्या नयन-निखारे !
थाड थाड उडणारें काळिज
बनुं द्या निकोप !
जाऊं द्या सळसळत
मातीच्या चेतन-लहरी
अंगांगांतुन !

मातीची जादू मग ओळखाल
मातीवर शिर टेकुन जर नमाल !

मातींतुन जर निघाल . . .
—तर हसाल ! !

भरगच्च शेत—
अब्जावधि हिरव्या चमचमत्या
पात्यांच्या हातांना पालवीत
वेगानें, जोशानें, वरवर जातें
सूर्यास्तव धगधगीत ! . . .
—तसे तरुण व्हाल

मातींतुन मानवता मृत्युंजय
मातींतुन सृजनाची गति अक्षय !

४-५-१९५२

# येत अहांत

येत अहांत
तुम्ही येत अहांत
इथें तिथें, अंध विवरांच्या चाळींत
कुंद, जून, कुबटशा काळ्या हवेंत
जित्या भावनांच्या विद्रूपशा स्मशानीं
गरोदर वेडीसम धूस ठोकत
दुखणाईत आत्मा झुराबावरा होत
तिथें कुठें तीच मर्मपीडा साहत
तुम्ही येत अहांत

परस्परप्रशंसेच्या नीच द्वेषांत
पाठीमागील निंदेच्या खुज्या पापांत
वांझोट्या विषारी अहंकार-हवेंत
अनर्गल बुद्धीचिया काळ्या झिज्यांत
तनुकर्ण, दीर्घद्वेषी सर्पवनांत
घडोघडीं रंग पालटत्या सड्यांत
ध्येय स्वार्थांतून चालणाऱ्या कर्कांत
सहजभावना फिरे, करी विलाप
तिच्या दमनाच्या यंत्रणांत जगत
तुम्ही येत अहांत

अंध अंगणांत सदा धुणें धुणाऱ्या
अर्धपोटी युवा मातेचिया कासांत
आणि टोपलींत दुखणाईत बाळाच्या
अतिक्षीण स्वरें फोडलेल्या टाहोंत !
वाटेकांठीं फेकलेल्या वहाणेगत

पुलाखालीं फेकलेल्या महारोग्यांत
बांधलेल्या पेंढीचा तो आळा सुटून
रानोमाळा पांगलेल्या साध्या स्वप्नांत
छाती बडवून रडे जीवन-वेडी
मागल्या रात्रीच्या क्षणीं दूर वनांत
तेथें तप्त सळईचे डाग सोसत
बाळमनावरी, दुःखें फार स्फुंदत
तुम्ही उभे अहांत

वैफल्याच्या भेसूरशा भुयारामधें
मृत्यूचे सुस्कारे भयभरें ऐकत
कामाचे योजनें लांब तास विक्राळ
तयांतून घामाघूम होत, झुंजत
कलंदरासम लुटवीत स्वतःस
हरएक जाणीवेचें मोल फेडत
स्वतःचें मरण स्वतः सुखें बघत
सर्वाष्लेशी व्यक्तित्वास आकार देत
तुम्ही येत अहांत

अहंकारें उंचावली भुवई एक
श्रेष्ठत्वाची सूज अंगोपांगीं चढली
निःसत्त्वशा हृदयांची सृष्टि विकृत
छंदफळांमधें किड्यांसम दडली
हस्तेंपरहस्तें भावनेची चौकशी
विलायती चौकटीची केली आयात
अशा लखाखत्या नव्या चौकटीमधें
उर-दर्दुरीची तट्ट फुगली ऐट
व्यक्तित्वास आरपार तडा गेलेल्या

दोन अश्वांवरी कशी टिके बैठक?
अशा विलक्षण प्रयत्नांत मरण
मरणांत करुणसा विनोद एक!
हृदयांस बेचैन ना करी आरती
घायाळ ना करी जीवनाची लागणी
लाकडाच्या रंगीतशा अश्वावरतीं
प्रशंसेची एक विदूषकी मागणी!
—अशा आवर्तांत तुम्ही जात, निघत
क्षुद्रतेच्या आघातांनीं गहिरे होत
तुम्ही येत अहांत

इथें तिथें, कुठें तरी जवळपास
शोधीत आहें मी तुमच्या सौम्य मुखास
आशयाच्या भारें कासावीस होऊन
शोधीत असाल तुम्ही नव्या बोलास
धरणीच्या रंध्रारंध्रामधून वेगें
हिर्व्या लाटांसम तुम्ही येत अहांत
पहाडांचीं हाडें हाडें मोडून कवे!
बलाढ्यशा धारांसम येत अहांत
छंदाछंदामधें वीज महादाहक
कड्कडाटांतून तिच्या येत अहांत
साऱ्या व्यक्तित्वाचें ओथंबून गगन
विराटशा वर्षेसम येत अहांत
धरणीच्या कसांतून येत अहांत
अनिवार्य सत्यासम येत अहांत
तुम्ही येत अहांत

१७-४-१९४९

## श्रावणढग

श्रावण-ढग पांगले हळूहळू
नि कोवळें पीत ऊन लागलें डुलूं
हरित हरित दाटशा तृणांकुरांवरी
...नी ऽ पलीकडील त्या
स्तब्धशा पहाडांवरी...
शुभ्रशुभ्र गुबगुबीत मेघ-मेंढरें
निळ्या दाट नभ-कुरणिं लागलीं फिरूं
इतस्ततः मोकळीं...

वायुची झुळुक स्वैरशी
शहारवी अननुभूत भावना-अतिशयें...
वयःसंधितील बाळ कोवळी!

अफाटशा नभाचिया
सुदूर कोपऱ्यांत एक
वृष्टिश्याम नम्रग्राम लखलखे उन्हांत खूप...
लाल छप्परांवरी
विपुल वाढली प्रसन्न वेल एक
तीवरी चमकती सुवर्णभोपळे अनेक

...तिथें...
वायु बावरून स्तब्धसा पळे
...नी ऽ तरुण निंब मंद मंद सळसळे

...तिथें...
निबिड स्वप्नगूढ छायाळ देशांत
अश्रूंत हासून

वैराग्य टाकून
पळत पळत जाइ एक बालिका...
स्वच्छंद...
तंद्रींत...

१-८-१९४३

# परिवर्तन

वाळलेल्या चामडीचे
नंगे हात हालवीत
उभीं झाडें वाऱ्यामुळें
कराकरा वांकतात

धूळ, पानें उडतात
जीवनाचा चिंधीचोळा
रसाचा संचार सूक्ष्म
थरकवी भाव भोळा

रडून सुजून गेले
लाल डोळे निवळले
वसंताचे लाल लाल
डहाळ्यांना बोल आले

आज तुझ्या चुंबनांत
जाणवतो नवा ऊष्मा
तुझ्या गाढालिंगनांत
औत्सुक्याची परिसीमा

पहाडांच्या शिखरीं त्या
पळसाची पेटे आग
आणि खोल दरींतले
जळतात काळे नाग

१-२-१९५०

# विरुनी सरावें वाटतें

जें चारु तें तें पाहुनी हुर्हुर मानसिं दाटते
जडता जिवाला जाचते, मन उन्मळूं हें पाहतें
कांहीं सुचेना जीवनीं, ना गोड कांहीं लागतें
अतनु व्हावें नी विरावें त्यांत ऐसें वाटतें

तीच तीची जीवनक्रम तीच ती संकीर्णता
पांखरूं बेफाम माझें जागतें किंचाळतें
देइ धडक्या पिंजऱ्याला मोकळें नभ पाहुनी
अनुभवूनी दिव्यता ती पंख अपुले झाडतें

ये अहाहा ! सांज ती पसरे धुकें संदिग्धसें
मंजुळ स्वरिं कोण तींतुनि हांक मजला मारतें
मी बोलतांची बोलतां विसरे वदे मी काय तें
अन् रोजचें जग पाहुनी मन विस्मयें भांबावतें.

मूक विरते सांज अंधुक शांत आरस्पान डोहीं
तेंवि सुंदरतेमधीं विरुनी सरावें वाटतें.

११-१-१९४३

## ठिणगी

हृदयाच्या अंधारीं
विझू विझू करणारी
परि झगडत फुलणारी
एकच एक चिमुकली ठिणगी
तीच असे माझी जिनगी !

अंधाराच्या विराट काळ्या ओठांमधुनी
मरणस्तोत्र ऐकत थिजणारा
भय-ज्वरानें ग्रस्त मनुज मी.
तरिहि चेतते हृदयीं ठिणगी
नयन चमकती
स्पष्ट पाहती
अंधाराचा भेसुर गाभा.

प्राणपणानें दिली साद
ती उडते
परंतु पडते पायाशीं
फडफडुनी मरते.
स्नेहाच्या हाताला हात मिळवितो
तीक्ष्ण घृणा-नख पंजा केसांचा !
उखडुनि पडले ते सारे सारे मैल-दगड
काळाचा रस्ता पोटाशीं पाय घेउनी निजलेला...निःस्वर !

आणि तयावर
पराजयाचे गुडघे टेकुन

दांत विचकुनी चढते प्रतिमा
नव्या योनिंतिल मनुपुत्राची !
करुणा भाकित :
"जय ! जय अंधाराची !
मेलेल्या रक्ताच्या थोर इमानाची जय !
अभय मला दे अभय !!"

बुजते स्मृति
नी मरतो अंकुर
आणि तरीहि
माझ्या हृदयामधली लाल तारका
लखलखुनी म्हणते :
"मी अजुनी स्फुरतें
मी अजुनी जळतें !"

जवळ सरकतां दो हृदयें तीं
पडे मधोमध भिंत अनामिक
दोन पावलें चालुन जातां
उरे मुखवटा गोठुनियां मुख
बोलायाला तोंड उघडतां
असत्य छाया पडे तयावर
आणि संशयें निथळत बघतां
सुरा हातचा कांपे थरथर

अंधाराच्या बादशहाचा
असे दबदबा दूरदूरवर

लुळ्या जिभेनें स्तोत्र तयाचें
म्हणत बैसले मोठे नरवर

धाक उभा
वळणावळणावर
बसलेला—मेजामेजाशीं अंधारांतिल...
लिहिलेला—
चालीचालींवर संदिग्ध थबकत्या...
बोलीबोलींवर गुळमुळत्या
नर्वस बोटांच्या चाळ्यावर
लवलेल्या पापणिवर
धाक असा लिहिलेला
—आणि तरी ही
माझ्या हृदयांतिल इवलीशी
कधीं न डरणारी—हटणारी
ठिणगी जळते
आणिक म्हणते :
"मी मृत्युंजय !
मज कसलें भय ?"

मीं न प्रार्थिलें अभय कधींहि
मागितली मीं कधिं न सुरक्षा
मीं न मानला जरा दरारा काळोखाचा
धाक दिला धुडकावुन
आणि मृत्युचा भेसुर चेहरा
साफ पाहिला पूर्ण न्याहळुन
काळोखाच्या बादशहाच्या मर्जीखातर
कधिं न वाकलों

कधिं न वागलों
आणि तयाच्या पापाचा पोलादी वेढा
कधीं न अडकूं दिला गळ्यामधिं
मीं न अभय मागितलें
दांतीं तृण धरुनी
राहियलों अणु बनुनी
या धाकाच्या रात्रीलागीं एकच उत्तर—
—माझी ठिणगी !

अजुन कोसळुन पडलें नाहीं विराट अंबर
अजुन शिळेच्या भेगांमधुनी निळें फूल हसणारें सुंदर
अजुन जीव ओवाळुनि जगती कितीक वेडेपीर कलंदर
अजुन मृत्युच्या कानीं पडती कितीक बेडर जीवन-जय-स्वर
अजुन विनाशाच्या स्तूपावर स्वप्न-चांदणें तरतें
अजुन निराशेच्या दारांतुन ऊन थबकतें, शिरतें
अजुन बीज धारण करण्याची शक्ति धरेच्या ठाईं
अजुन अंकुरांतील जोम जगण्याचा मेला नाहीं
अजुन प्रसूतीचिया कळांचा विसर न मनुजाला पडला
अजुन हासतें तान्हें, कविचा घुमे मोकळा गळा
अजुन कोसळुन पडलें नाहीं विराट अंबर
अजुन शिळेच्या भेगांमधुनी निळें फूल हसणारें सुंदर
"मीच असें तें रहस्य"
सांगे हसुनी ठिणगी
"चेतव मज ! चेतव मज ! !
पणास लावुनि जिनगी."

—पूर्वीं, फारच पूर्वीं
अशिच एकदां काळरात्र वैऱ्याची होती

आदिमनुज ॲडमच्यापाशीं बसली होती ईव
नि दृष्टी तिची विलक्षण चमकत होती
त्या अंधारीं
अतिशय सावधपणें बघूनी चौबाजूला
ती ॲडमच्या कानीं कांहींसें कुजबुजली !
मंत्र ऐकुनी
अतिशय दचकुनि
थरथर कांपत
दृग विस्फारुनि
बघत राहिला होता क्षणभर ॲडम :
नवस्वप्नाच्या चैतन्यानें रसरसणाऱ्या
नग्न विजेसम लवलवणाऱ्या ईवकडे तो !
करूं लागले लखलख लखलख
त्याचे डोळे
जणूं ज्वरानें !
गूढपणानें ईव म्हणाली :
" तें बघ ! तें बघ ! तेंच हवें अपुल्याला ! "
झाडावरतीं लोंबत होतें लाल ज्ञानफळ
अंगाऱ्यासम निषिद्ध सुंदर
—आणिक एका प्रबळ प्रवाहें भारुन जाउन
मानव-इतिहासांतिल एका परम शुभ क्षणिं
स्वतांस विसरुन
आज्ञा लंघुन
खुडलें तें फळ !

वज्राघात !
नि विराट वादळ
क्रोधाचें सोसाटत सुटलें

घोर तमिस्रेमध्यें तेधवां
फिरूं लागलें गरगर अंबर
दंडित ॲडम निपचित पडला
बसली वाचा !

मिठी मारुनी धरेस तेव्हां
भिजविलि होती भुइची छाती
रडला होता घळघळ
कळवळली धरणी मग
मातीनें माखून तयाला
अभय देउनी
आणि स्वतांच्या कणाकणांतुन
स्फुरणारें निर्मितिचें दाहक स्पंदन
ठिणगी बनवुन
त्याला देउन
घोर तमिस्रेंतून म्हणाली होती :
"अमर असो ही ठिणगी
आणिक अमर असो तव गुन्हा
असो चिरंतन बंड तुझें
तूं स्वर्ग निर्मिशिल पुन्हा !"

ॲडमनें डोळे पुसले—वर केले
तत्क्षणिं त्याला दिसलें, "अरे ! तांबडें फुटलें !"
उभा जाहला होता ॲडम, गगनीं जाउन भिडला
थरथरत्या ईवाच्या तनुला सावरीत वदला :
"बघ प्रिये, तांबडें फुटलें !
या ठिणगीनें रक्तचिन्ह त्या दिशेंत उमटविलें !"

ऊर दुभंगुनि काळोखाचा
अशी जन्मली ठिणगी
सूर्य बनुनि धगधगली कधिंकधिं
जखम बनूनी जगली !

ही नच ठिणगी;
हीं तर तळख नसा वळवुनी
चपल आणि मजबूत पाउलें
वादळ चिरुनी
हिमालयाच्या विराट दुर्गम
कड्याकड्यांना वळसे घालुनि
शिखरांवर जीं ठाम बनूनी उभीं राहिलीं !

ही नच ठिणगी;
अजस्र काळेकाळे हातच
भक्कम चौरस पोलादी मनगट असलेले
कुदळ मारुनी
खाण खोदती अंधाराची !

ही नच ठिणगी;
हे तर डोळे
अंधाराच्या स्तंभामागें
दडुनि मन्सुबे काळे हेरत
हिऱ्यासारखे लखलखणारे !

ही नच ठिणगी;
हें तर हृदयच

कवचाकवचांतुन दडलेलें
पड्यापड्यामधिं लपलेलें
अतिभयकातर, जर्जर, हळवें
परंतु शाबुत आणि धुमसतें
हें तर हृदयच !
( माझें हृदयच ! )

—आणि म्हणूनच
भरुन येतें सदाच आणिक सदा दिलासा मिळतो
सर्व दृष्टिनें पंगु असुनि मी तमांत लखलखतों
बिनचेहऱ्यांच्या संत्र्यांतुन कळपुतळे मुकाट फिरती
मी त्यांच्या कानांशीं कर्कश हसुनी हिणवीतों
टेकुनि माथा पायऱ्यांवरी सज्जन नमलेले
फटिंग मी तर म्हणुनि मृत्युची नाडी चांचपतों
उद्धट भाषेलागीं माझ्या सज्जन ठेविति नांवें
अस्सल सत्यानें मग सांगा कैसें वागावें ?
अभय तयांना मिळे, सुदैवें जखम लाभली मला
तेव्हांपासुनि त्यांचा माझा उभाच दावा ठरला
काळोखाच्या राज्यामधले पेंच भयंकर असती
भरे उसासा, उद्‌गारांवर कडक पहारे बसती
असेल सत्ता अशी भयंकर दैत्यांची न तमा
मजला ठिणगी म्हणे—पहा तूं अनंत डोळ्यांची प्रतिमा
आणिक चमकत मला म्हणे—काळोखाखालून
लाल अग्निचे सर्पच निघती पूर्ण उफाळून
स्तंभांना अंगारभाव हा विळखे देऊन
संथ आणि निःशब्द सरकतो वरवर जाऊन
ठाशिव छाया खिळलेल्या त्या, त्यांत उजाळून
उठून बसतिल अजस्र हाता वर उंचावून

प्रचंड लांबट पापण्यांस त्या काळ्या उघडून
ज्वाळांच्या दृष्टीनें बघतिल अवश्य निरखून
वर्ख नीतिचा गळुनी, गाळण उडेल सज्जनवृंदांची
शिरेल छातीमध्यें मृत्युच्या कट्यार ॲडमपुत्राची
आणि मृत्युनें सदा दिलेले धुवून निघतिल डाग
सुर्कुत्यांचिया विषण्ण जाळ्या गळून पडतिल पार
वेल सृष्टिची सावरुनी, नव वळण लावतील
दोन हात ते आणिक डोळे हसत चमकतील
अवश्य सूर्याचिया पांढऱ्या मऊ प्रकाशाची
दुनिया येइल श्वेत फुलांतुन गुलाबि चेहऱ्याची
हें ठिणगीचें स्वप्नसत्य !
हें अग्निकेंद्र
ज्याच्या भंवतीं जळतें वर्तुळ फिरतें
निळ्याजांभळ्या पीडेचें—आशांचें

ही ठिणगी—
कवचाकवचांतुन लपलेल्या हृदयांना
श्रद्धेची लाललाल तार बनुन गोवितसे
धगधगत्या सत्याच्या कंदाभंवतालीं

अकस्मात
ही विराट
दहशतशी एक हांक !
मसणशांति चिरत चिरत
वेगानें सरसरत
लखलखत्या जंबियासमान !
परिणामीं अटळ !
प्रबळ ! !

आणि तीच
कुजबुज ती, कोमल गोंजारत
अगदीं जीवाभावाची
पण आग्रहि, पण आग्रही,
चमकत म्हणते :
"वा इमान ! वा जिन्दगी !
युगेंयुगें यज्ञावर पोसत मी आलेली
रक्तांतुन फुललेली तुमच्या मी—
ठिणगी !
मी तुमची ठिणगी ! !"

४-३-१९५३

## जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात

जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात
जेव्हां अंधाराचे रोड पाय येतात भरभर जवळ जवळ
जेव्हां भिंतीवर उपेक्षांच्या छायांमध्यें कुत्सित कुजबूज चालते
जेव्हां ज्या पायावर टेकलें होतेंस डोकें
त्याच्या दगडी आघातानें कपाळ रक्ताळतें
तेव्हां कां तिळतिळ तुटतें तुझें मन ?
तेव्हां कां काळजांत खोल बाण रुतलेल्या पांखरागत
तडफडतें जीवन ?
तेव्हां कां घबराटानें किंकाळी फोडावीशी वाटते ?
तेव्हां कां तक्रारीच्या चीत्कारांनीं सारी रात्र
आक्रंदून टाकावीशी वाटते ?
तेव्हां कां, तेव्हां कां मरावेंसें वाटतें ?
नि मरतांना शाप देऊन निघावेंसें वाटतें ?

जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात
जेव्हां ते तुझ्यावरून मंदावत दुजावर फांकतात
जेव्हां मनाला बांधलेलीं धरणें
धुळीच्या ढिगागत पांगतात
काळ्याभोर निराशेच्या लोटाखालीं
जेव्हां अज्ञाताच्या खडकाचा मार लागून
फरारा उभारून फिरणारें गलबत
तुकडे बनून अंधारांत तरंगतें
तेव्हां तुझ्या मुठींतील ध्रुवतारा कुठें जातो ?
तेव्हां तुझ्या आत्म्याच्या दयामय आभाळाचा
टर्रकन कां फाटतो रंगपट ?
आणि कां बाहेर येतें

आंधळ्या बुबुळांना हालवीत
आदि-अंतहीन एक महाशून्य ! !
ज्याची तूं उडविली होतीस टर
बाळमूठ हालवून
दाविली होतीस डर
त्याच्या फक्त निःशब्द गारगार उच्छ्वासानें
गाळण कां उडाली ?
नि तात्काळ वाहिलीस पायावर गाथा तुझी !
तिच्यामध्यें तर तुझ्या आत्म्याचा शब्द होता !

जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात
जेव्हां हिशेबांत धरलेले भरंवसे जमत नाहींत
नकळत नांवें मांडलेल्या बाक्याहि चुकत नाहींत
जेव्हां भराभर चुकतात मनीं मांडलेलीं समीकरणें
जेव्हां शेजारुन कोणी उठून दूर जातें
जेव्हां दाराशीं उभा होतो शिपाई
अज्ञात अपराधांचें बजावण्यास वॉरंट !
जेव्हां मनांतल्या संताला खरेंच नेतात
फराफरा ओढीत रस्त्यावर कूस देऊन
नि उंच केलेल्या हातांवर
खरेंच जेव्हां क्रूर खिळे ठोकतात
आणि तूंच दिलेली हाक जेव्हां
क्षितिजाच्या कांठावर उभी राहून
तुलाच वेडावते
तेव्हां कां
कुण्या निर्दयानें हाणलेली लाथ खाऊन
केकाटत कुठें तरी पळत जातें
अहंमन्य श्वान एक !
जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात.

जेव्हां घोरणाऱ्या अंधाराची खवलेदार पाठ दिसते
पोट दिसत नाहीं पण
जेव्हां छातीवर टेकलेल्या खंजिराची धार दिसते
हात दिसत नाहीं पण
नि हैवान शेजारीं हसतो
इन्सान दिसत नाहीं पण
तेव्हां
तुझ्या श्रद्धेचा ताबूत
न पेटतांच राख होतो
उघडी होते
जल्पनांच्या बांबूंची केविलवाणी गुंतावळ !
जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23048 दि: 3/1/55
क्रमांक 7386 नों दि 28/3/58

व्यर्थ जगविली काया
सत्य नाहीं जाणलेंस
व्यर्थ शिणविली वाणी
दुःख नाहीं भोगलेंस
प्रेम केलें आणि त्याचा
मनांत हिशेब होता
स्नेह त्यांचा, तुझा फक्त
अहंतेचा पेट होता

सत्य, सत्य, सत्य फक्त
त्यांचीच अमर वाणी
उरल्यांचे बहाणे !
अघोर तें रौद्रसत्य
पाहील् त्या समोर ठेवी
मृत्यू स्वतः नजराणे !

जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात
तेव्हांच फक्त स्वतःला जाणावें
तेव्हांच फक्त स्वतःच्या पुंजीचा अदमास घ्यावा
तेव्हांच फक्त अंतरींचा जिव्हाळा जागवून
तीच महाप्राचीन
चिरपुरातन
नवअभिप्रायोत्कट
हांक द्यावी
तेव्हांच फक्त शिळेपोटीं झरे शोधावे
तेव्हांच फक्त कांट्यामागें घ्यावेत फुलांचे मागोवे
तेव्हांच फक्त आजच्या एकाकीपणामध्यें
उद्यांच्या सहवासांत मस्त व्हावें
तेव्हांच फक्त
जीवनाचें सारें मोल द्यावें
आणि मग शब्द उच्चारावे !
जेव्हां स्नेहाचे दिवे मिणमिण करूं लागतात.

११-६-१९५४

## धिःकारुनी तुम्हांस मी

धिःकारुनी तुम्हांस मी
हा चालल्लों ऐसा पुढें
मर्म यांतिल हेंच कीं
मी येथला तुम्हि तेथले !

तुम्हि तेथले हो पाप जेथें
सौम्य सुंदर हासतें
अन् चौर्य गद्‌गद संतवाणी
बोलतां नभ गाजतें

तुम्हि तेथले जिथुनी पळे
शेपूट घालुनि सत्य तें
सौंदर्य जेथें "दाम नगदी
टाक आधीं" सांगतें.

तुम्हि तेथले आज्ञंत जेथें
ज्ञान पायीं लुडबुडे
अन् दंभ पोथी धरुनि पुढतीं
देइ नीतीचे धडे

तुम्हि तेथले तिर्की जिथें
हो प्रेम डोळा मारतें
नाण्याचिया नादावरी
कंबर कलेची हालते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४०५

तुम्हि तेथले मर्जीतले
हलुवारसे, सुकुमारसे
मी येथला सर्वांतला
अतिशय कडू माझें हसें

तोडलें तुम्हांस, माझी
जखम चमकूं लागली
अन् तयाची डोंगरी
छाया अचानक पाहिली.

११-६-१९५३

# अंधाराला डोळा निघे

अंधाराला डोळा निघे
विलक्षण लाल लाल
त्याच्या लाल किरणांत
माझें उजळ कपाळ

अशा लाल लाटेंतून
पाठी पेटत्या धावती
त्यांना पहाड-गिधाडें
खालीं वाकून वेचती

अंधाराच्या कपारींत
कसेसें कोरडें हासे
टप्टप् गळती खालीं
सुंदरींचे देह-ठसे

काळेकुळकुळीत तेल
प्यालेले मजबूत वासे
जळतात सावकाश
त्यांत उभे जुने खासे

काळा काळा तळहात
लाल भाग्यरेषा धावे
तिच्या आगींतून सैन्य-
पंक्ती घेई हेलकावे

अंधाराला डोळा निघे
विलक्षण लाल लाल
त्याच्या लाल किरणांत
माझें उजळ कपाळ

२४-१-१९५०

# जरी कालचें स्वप्न तडकलें

जरी कालचें स्वप्न तडकलें
मुकाट हसते सुंदर आशा
यांत काय तें समजा एकच
—कळी जन्मतः हरवी नाशा

दांत विचकतें अजस्र जंगी
यंत्र उद्यांच्या संहाराचें
तरी उद्यांचे तज्ञ आंखती
नव्या जगाचे नवे नकाशे !

बुद्धिभ्रंश बुद्धीचा झाला
सरळ भावना रडे पोरकी ! !
हेंहि खरें कीं गहिरी आस्था
शिरत तळाशीं मूळच हुडकी

कोसळणारे कोसळतीलच
डगडग हलते जीर्ण मनोरे
आणि उताणे होणारच ते
गगनीं भिडले ताबुत सारे

त्या सर्वांचें रक्षण करण्या
मुडदे झुलतिल झाडांवरतीं
पोलादाचे राजे येउन
खिळे ठोकतिल ओठांवरतीं

—यांत काय तें समजा तरिही
उहाळ खचते लाल कळ्यांनीं
चैतन्याच्या याच विजेचे
झटके बसती जगीं आंतुनी

'नको ! नको ! !'च्या सर्व भावना
त्यास कळेना नवा इशारा
प्रश्नाच्या चिन्हांत अडकुनी
मान, उपटतो केस बिचारा !

नैराश्याचा नाजुक नखरा
श्रीमंतीची विरक्त वाणी
माणुसकीचें मर्म विसरतां
बुळींच ठरतिल चढेल गाणीं ! !

जरी कालचें स्वप्न तडकलें
मुकाट हसते सुंदर आशा
यांत काय तें समजा एकच
—कळी जन्मतः हरवी नाशा

२५-११-१९५२

# खरें वाटो कीं न वाटो

माझ्या आशेला उमाळा आहे, खरें वाटो कीं न वाटो तुला
माझ्या दुःखाला जिव्हाळा आहे, खरें वाटो कीं न वाटो तुला
मी म्हणतों कीं माझे आंसू असतात ऊन ऊन
त्यांना तूंच दिली धग, खरें वाटो कीं न वाटो तुला!

निराशेची तल्ख सुरा पिऊनि कैफांत सदा
उदास भिंतीशीं उभ्याउभ्याच गातों मी यदा
काय सांगूं आपोआप पहाटेचें घुमे गीत
तुझीच ही शक्ति न्यारी, खरें वाटो कीं न वाटो तुला!

मी म्हणतों कीं माझी व्यथा मला वरदान आहे
तींत स्वप्नें पाहणारा एक धुंद प्राण आहे
दंग स्वप्नऐश्वर्यांत मृत्यूलाहि वेडावतों
तुझीच ही बादशाही! खरें वाटो कीं न वाटो तुला!

मी म्हणतों कीं खरें आहे सारे दिवे मालवले
भयें सारीं दारें बंद, आडसर घातलेले
उरल्यांची लुळी जीभ शब्द उच्चारी तोतरे
गप्प बसे तत्क्षणींच दचकून भयभरें...
अशा भेसूर या रात्रीं पहाडी हा माझा स्वर
उंचावून मस्त गातों जागृतीचा छंद स्वैर
मृत्यूसमोर हा माझा बेगुमान ताठा... तुझा!
तुझीच ही जयद्वाही, खरें वाटो कीं न वाटो तुला!

१७-४-१९५१

# वर्दळींत जगतांना

वर्दळींत जगतांना हृदय खिन्न होतें
ओसरतां अवचित ती, हृदय शून्य होतें
आत्म्याचा डोह ऐल, पैल जगत-कोलाहल
ना इथलें...ना तिथलें...दिशाहीन मन बनतें

जगताचीं ऋणें किती हृदयामधिं तगमगती
आत्म्याचीं गूढें किति स्तब्धपणें खुणवीती
हें सारें सांठविलें, हें सारें आकळिलें...
परि कुठली भेटली न अजुनी मज मूळ-गती!

देत देत आलों तरि देणें नच फिटतें कधिं
सहन करित आलों तरि साहणें न सुटतें कधिं
मूळांतुनि जगतों जरि, अंतराय उरतो तरि
माझ्या अन् त्यांच्या मधिं हेलावे तोच उदधि

मुळींचेच पीडेचे पंख मला दिधले कुणिं
उदधि पार जाण्याला उडलों मी झेंपावुनि
उडत सतत राहियलों कोटि योजनें अशांत
आलें रे पैल म्हणुनि पाय रोविले तशांत

तोच ऐल होता नी आरंभहि तोच दिसे
तीच व्यथा एकाकी, एकाकी वाणि असे
त्या व्यथेंत नच झालें व्यक्त गूज कोणाचें
वाणी ही दीन तशी...दुःख-ब्रह्म तींत नसे

मग मजला ध्यास दिला कां असला...तळमळ हो ?
कां मजला पंख दिले उडण्याला वर वर हो !
सिरवितसें खूण उरीं मी एका ज्वालेची
जखम जळे, ती मजला शाप ठरो...कीं वर हो !

जर आहें एकाकी, तर कोठुनि ही ज्वाला ?
तर कोठुनि उदधिघोष खुणवी मज उडण्याला ?
जर आहें एकाकी...ऋण झालें कोठुनि हें ?
कोणाचे दृष्टिकिरण कीं असती सोबतिला ?

निर्जनतेचे विशाल हे पिवळे माळ उभे
हालतसे छायांचें खिन्न मुकें बाळ तिथें
तुमुल ध्वनिचे पहाड घरघरत्या चक्रांचे
उदरांतिल आगींतुन रोषाचा धूम निघे

त्या तेथें वाऱ्याचे स्वैर पाय अडखळती
या येथें सूर्याचे कर काळे अति पडती
त्या तेथें भूमीच्या दुःखानें सृष्टि बधिर
या येथें अपस्मार-झटक्यांची तीव्र गती

येइ उषा भीतीनें मलिनवदन होउनियां
संध्या ये केशांमधिं मुख अपुलें लपवुनियां
रात्रि लवे छत काळें मूर्च्छित या विश्वावर
आणि 'उद्यां' म्हणतां कुणि जग उठतें दचकुनियां

मृत्यूच्या स्तूपांच्या छायामय देशीं मी
व्यूहांतुनि वाट चुकुनि भिरभिरतों दुःखी मी

रे बीजा, कोठें तूं, कोठें तूं असशी का ?
हाका मी देइं तोंच दुमदुम ध्वनि ऐकें मी

मी स्वतांत पाहिं मला मृत्यूची हार दिसे
अंधारीं म्हणुनि हाक उत्कट मी देत असें
तिमिर-शिळा फोडा हो, बीजांनो बोला हो
हुंकारावर तुमच्या सत्याचें स्वत्व असे !

प्राणांचें सत्य जळे मृत्यूच्या वेढ्यामधिं
श्रद्धेचा अढळपणा तिमिराच्या घेऱ्यामधिं
सत्य जळे परि त्यानें नच पेटे आसमंत
श्रद्धेची हाक विरे हृदयांच्या थडग्यांवरि

हाकेला हाक न ये, प्रेमांतुनि प्रेम न ये
प्रतिकारांतूनि कधीं बंडाची ऊर्मि न ये
दगडांच्या पायांवर पडलेल्या माना किति
दुःखाला रुद्राचें मृत्युंजय रूप न ये

सत्य कधीं एकाकी असतें का ? लपतें का ?
सृजनाचे प्रबळ झरे असुनि, परत फिरती का ?
सिंधु प्रबळ धमन्यांतुनि सळसळतो, व्याकुळतो;
हें सगळें असुनि असें नसल्यागत होतें का ?

१-१०-१९५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 23045 वि. काव्य
क्रमांक 9368 नों. दि. 28/7/5

# भि क्षा

कारुण्याचे उभे धबधबे सदा वाहवूं
परंतु त्यांच्या दुःखाची कळ कळो न आम्हां
'जनता', 'जनता' स्तोत्र म्हणूं जरि सांजसकाळीं
परंतु त्याचें पाप कधीं नच लागो आम्हां.

'सत्य', 'सत्य' सत्याचे आम्ही भक्त बिलंदर
पिढीजाद किल्ल्यांचे राखणदार इमानी.
सत्य आणि असत्यामधले अट्टल सज्जन
दोघांसाठीं अमुची तल्लख तयार वाणी.

तेल निघूं द्या, चालो घाणी!
जिकडे नाणीं, तिकडे वाणी!
गहाण गाणीं कुणीं टाकिलीं, कशीं टाकिलीं?
त्याला ठाउक ज्याची सदा कडी निगराणी!

प्रायश्चित्त सर्व पापांचें यजमानांना देऊं शोधुनि
सत्याचे कैवारी आम्ही, युगायुगांचे त्यांचे ब्राह्मण!

नवाच कोणी रामशास्त्रि पण देहांताची सांगिल शिक्षा
अमुची गनिमी रीत सदाची! नाक घासुं अन् मागूं भिक्षा!

१७-४-१९५५

# जेव्हां आत्मा फोडासम दुखतो

जेव्हां आत्मा फोडासम दुखतो
त्यावर मलम मुलायम लावावें स्वप्नांचें
...आणिक येथुन चालत जाउन
दूरदूरचे वळसे घेउन
फिरून घर गांठावें त्याचें
जेथें आत्मा फोडासम दुखतो !

दुःख करावें...
आणि म्हणावें :
"पहा, पहा, हें घर हो
याच्या विटांविटांतुन चुना लावला अमुच्या आयुष्याचा
फसव्या तत्त्वज्ञानाचें लावियलें रोगण
आंतिल काळ्या आदेशांनीं
रखुमाईच्या तोंडामधला घास काढला जातो
वणवण फिरे विठोबा
पुलाखालतीं भजनमग्न त्या कुण्या तुक्याचे
पाय धरुनियां म्हणतो,
'सोडा अमुचा नाद तुकोबा आतां.'"

दुःख करावें
आणि म्हणावें :
"मी उलथुन टाकिन हा किल्ला
मी सत्याचा लढवैय्या
रंगरंगोटी केलेल्या भाटांना
चाटुकार नर्तकवृंदांना

लाथ हाणुनी
हटविन त्यांना
आत्म्याच्या बीजांना
फिरून पेरिन विराट भूमीमध्यें पृथ्विच्या
सृजनाची नवसृष्टी उभविन."
—असें म्हणावें
कल्पनेमध्यें बंड करावें
ध्येयाच्या वारूवर बसुनी
दूरदूरचे वळसे घेउनि
फिरून घर गांठावें त्याचें
जेथें आत्मा फोडासम दुखतो.

हे शब्दांचे गजर कशाला ?
तुला नि मजला
तारेवरची कसरत करणारांना ?
कसरत कर तूं किंवा मर रे
हासत कर वा शिव्या देत कर
जमव फक्त तूं गल्ला
कर कसला मग हल्ला
मिळतिल तुजला टाळ्या
भरतिल त्यांच्या थाळ्या
तूं कल्पनेंतल्या वारूवरतीं पाश तोडुनी धावत असतो
खेळाला रंगच भरतो !!

कशा काढतां राव नांव संतांचें
पृथ्वीच्या गर्भातुनि काढुन
क्षितिजावर स्थिर केला होता निष्ठासूर्य तयांनीं
कोट्यावधि लखलखले होते डोळे त्यांच्या प्रतिबिंबांनीं

तुमचा सूर्य रुपाया
बुळी त्यामुळें तुमची वाणी !!

संतांनीं फुंकिलें आपुलें घर आधीं
होउन निरुपाधी
दिधली सत्याची ललकारी
दांभिक पोथीवेड्यांची मग वळे बोबडी
विचार त्यांचे
सहस्र सूर्यकिरण-अश्वांसम दौडत गेले दाहि दिशांना
तुमचें तर घरकुल !
त्यांतच तुमचें हृदय विचारें
चिवचिवणारें थरकांपत बसणारें
लुळीं त्यामुळें तुमचीं गाणीं !!
विचार तुमचे
भुसा भरुनी उभविलेत पुतळे !
तरीहि त्यांचे भेदरलेले डोळे !

ते निःसंशय
मूर्तिमंत अम्हि संशय
तिथें धडाडी
आम्ही तर केवळ भय
ते पुढें पुढें
तर आम्ही केवळ वर्तुळ
ते जन-जीवन-जय
तर आम्ही केवळ मृण्मय
ते सत्याची हांक
अम्हि अटळ मृत्यु-थरकांप
ते विश्वात्म्याचे आप्त

अम्हि अहंभाव-तमव्याप्त
ते मानवतेचे डोळे
अम्हि पायामधली बेडी
ते सत्यखड्गआघात
अम्हि उसवित राहूं कोडीं
कशा काढतां राव नांव संतांचें ?
बंडाची भाषा काढिति का चेहरे नाण्यावरचे ?

'कबिरा खडा बजारमें लिए लुकाठी हाथ
जो घर फूंके आपना, चले हमारे साथ.'

कबीर होता फक्कड एक
होता मौला पीर
मर्म तयाला माहित होतें
दांभिकगण दिल्गीर.
माहित होतें त्याला कीं
अपुला जीव गरीब
गुलाम बंदा प्रेमाचा
मुठींत ठेवि नशीब !
खरी फक्त ही मेहनत जी
पिळून काढी घाम
घाम इमानी गाळित असतां
मुखीं असावा राम
खरें फक्त हें जातें जें
पाडी पिवळें पीठ
खरें फक्त हें नातें जें
नजरा करतें धीट
माहित होतें त्याला कीं

विचारभांडीं रिक्त
परस्परांवर आदळतां
घणघण करिती फक्त.
कबीर होता फक्कड एक
उभा सदा चौकांत
हटकित राही सर्वांना
चालति जे झोकांत

असा कबीरा ऐकुनियां भयें कांपती प्राण
मागुनि तरिही जाण्याला तडफड करी इमान!

तडफड करी इमान
तर तें तस्बिरींत ठेवावें
रोज सकाळीं उठून
त्याचें प्रेमें भजन करावें
किंवा त्याचें पीस करावें
वहींत ठेवावें
हुरहुर करतां जीव कधीं तें
गालीं कुर्वाळावें
परंतु जर का फोड तयाचा
ठसठस फारच करूं लागला
तर मलम मुलायम लावावें स्वप्नांचें
आणिक येथुन चालत जाउन
दूरदूरचे वळसे घेउन
फिरून घर गांठावें त्याचें
जेथें आत्मा फोडासम दुखतो!

रोज करावा मुजरा
आणिक रोज मरण सोसावें
अर्धेमुर्धे रडें हसावें
हसें रडावें
आणि अखेरिस
'आ' करुनी दळतां जबड्यानें विराट काळ्या
किंकाळी फोडावी त्याच धन्याच्या नांवानें
अन् 'राम' म्हणावें
'राम' म्हणावें !

२०-८-१९५५

# चकित दृष्टि ती

सुरू जाहली चढण खरी
अन् पहाडांतले कभिन्न काळे
दगड सारखे हसूं लागले
काळोखाच्या चिंध्या मिरवित
खुजीं वाळकीं झुडुपेंदेखिल
हिणवुं लागलीं
मित्रे बुजरे कितीक प्राणी
भिववुं लागले
शिळांआडुनी
गळे काढुनी !
सुरू जाहली चढण खरी
अन् अंधारांतच कोल्हे हसले !
आणि म्हणाले :
"अहा पर्वणी !
याच्या होतिल चिंध्या आतां
भयंकराला नमन करी ना हा बेमुर्वत
पहा, पहा, हो याची गंमत ! !"

तोही होता एक प्रजाजन भयंकराचा
डोळ्यामध्यें मरणाची लुकलुक त्याच्याही
भयंकराच्या पायतळींचें अन्नच होतें
त्याचेंही पण;
परंतु त्याला उपजत होतें दिसलें कांहीं
तेंच कांहिंसें सांगत होता
जाणिवेंतुनी अधीर होउनि !

निश्चळता ती ओबडधोबड स्फुरूं लागली
काळीं बुबुळें सरकुनि वरतीं ऐकुं लागलीं
कुजबुज सरकत सरकत गेली :
'खोलवरी जें पुरलें त्यांनीं
अजून आहे! अजून आहे!'

भयंकराच्या पायतळींचें
खातां खातां
लक्तरलेला, दुर्बल
आणिक काळोखाची चीप असा तो
छातीवरच्या चिंध्या फाडित म्हणूं लागला :
"येथें आहे, कांहीं उमटुन
दुखतें आहे
म्हणून मजला दिसतें आहे!!"

काळोखाच्या भाळावरतीं
रक्ताचे सुकलेले ओघळ
किती सांपळे जठरीं स्मरुनी
किंचित् हसला काळा अजगर

भयंकराच्या अजस्र पायीं
किंचित् जेव्हां चळवळ झाली
भल्याभल्यांचीं तोंडें तेव्हां
फेस येउनी थिजुनि वाकुडीं

पिसा मात्र तो स्तंभित होता
दृष्टिसमोरिल बघून कांहीं

ताठ तयाची मान मात्र तें
जंगल सारें चोरुनि पाही !

—परी अचानक उमजुन कांहीं
काळाठिक्कर पडला डोंगर
सभ्य, सुज्ञ जे कोल्हे तेही
मान हालवित आले सत्वर

"—मान ताठ ! हा नवीन प्राणी
बोली याची पूर्ण वेगळी
म्हणतो कांहीं दिसतें आहे
हद्द जाहली अपमानाची !
—कैक येउनी गेले येथें
पिसें लावुनी डोमकावळे
काय तयांचें झालें नंतर
सुज्ञांना तर ठाउक सगळें ! !"

पिसाट तो तर बोलत होता :
"भयंकराचे क्रीतदास हो
शुभंकराचें स्वप्न पडूं द्या
माझ्या स्वप्नांतुनी तुम्हांला
तुमचा साक्षात्कार घडूं द्या !
काळीं काळीं फुलें खरीं
पण गुलाब त्यांतुन फुलेल कैसा ?
काळ्या काळ्या ज्योति खऱ्या
पण दिवा केशरी दिसेल कैसा ?
काळोखाच्या लाख परींना
सत्याची त्या सर येइल का ?

काळोखाशीं करुनि सलोखा
सत्य खंडशः राहि कधीं का ?”

पिसा सारखा बरळत होता
जंगल सारें ऐकत होतें
पहाडांतले सारे प्राणी
स्मरत कांहिंसें बसले होते…

अधिक दाट अंधारुनि आलें
कुत्सित दबकें हसें उसळलें
काळ्या बुबुळामधली लुकलुक
भिऊनि थिजली हलके हलके

—वळण लागलें अंधारांतिल
पहिल्या वळणाशीं अडखळला
शिळांआडचें कुत्सित गाणें
ऐकुनियां तो जरा थबकला
‘हो हो’ खिदळत कोल्हे जमले
घुबड दार्शनिक जागा झाला
चष्मा सारुनि वरतीं तोही
कुतूहलानें बघूं लागला—

“—तारा असतो म्हणतो आहे
दांभिक चिरडुनि टाका ऐसा
मान ताठ, अन् बघतो आहे !
गर्विष्ठाचा मोडा हेका
दंग स्वतांतच असतो याची
गुर्मी काढा अतां सदाची

काळोखाचा नियम चिरंतन
वक्रदृष्टि अन् भयंकराची
नाहीं ठाउक याला, आम्ही
युगायुगाचे अनुभव साक्षी
काळोखाला हसतो आहे
व्यर्थ तपश्चर्या मग अमुची !"

—पहाडांतले सुळके काळे
दांत विचकुनी हसूं लागले
उंदिर ! तेही धीट होउनी
भर रस्त्यावर उडूं लागले
अजगर बदलुनि कूस जरासा
दीर्घ जांभई देउं लागला
कोल्ह्यांचा अन् क्रुद्ध कळप तो
सात्त्विक संतापांत भडकला !

तरिहि म्हणाला—"तारा तो—"
अन् झुंडी काळ्या तुटून पडल्या
द्वेष अनावर, दांत रोवुनी
शरीर फाडुनि केलें चिंध्या !

मरतां मरतां दृष्टि तयाची
चकित अचानक झाली होती
द्वेषाच्या धुंदींत तयांच्या
नजरेंतुनि ती सुटली होती !

अंधाराच्या कड्यावरूनी
लोळागोळा दिला फेकुनी

फिरुनि एकदां रक्त वाहिलें
भयंकराचे चरण क्षाळुनी

काळोखाला ढवळित हो हो
घुबड अचानक हसूं लागला
"एक आरसा होता, फुटला,
भले गड्यांनो!..." म्हणूं लागला!

शिळेंशिळेंतुन चकित दृष्टि ती
दचकुनि सारे बघूं लागले
काळोखानें जीभ लांबवुनि
संथपणानें रक्त चाटलें.

१७-५-१९५६

# आ तां

सारें धुकें सरलें आहे.

माझ्या थरथरत्या हाताला चैतन्यानें
स्पर्श केला, आणि म्हटलें:
सरुं दे व्यथा तुझी, वाटचालीची !

आतां तूं जेथें असशील तोच मुक्काम आहे
आतां तूं जें जें करशील तेंच काम आहे

आतां स्वप्नांचा लाचार आधार तुला नको
धुक्यांतील इंद्रधनुष्याची बहार तुला नको

आतां सत्यानें तुझें हृदय दुभंगून टाकलें आहे
आणि त्यामधून आपलेच सूर भरले आहेत

आतां तुझ्या अश्रूंचा छान उजेड पडेल
आणि तुझ्या पावलांचा नेटका ठसा दिसेल.

१-२-१९५५

# दोन ज्योति

दुःख सर्वांचेंच आहे
तुमचें आहे, माझें आहे
पण दुःखादुःखाच्या जाती असतात.

एका दुःखाची ज्योत काळीभोर असते
तिच्यांतून बेचैनीच्या काळ्या ठिणग्या झडत असतात
काजळीच उरत असते.

एका दुःखाची ज्योत लाल असते
अंधारावर तिचें पीस उठून दिसतें
तिच्यामधून ठिणग्यांचे तारे उडतात
दूर दूर धावतात
डोळ्यांच्या बाहुल्यांतून चमकतात
पुष्कळ वर्षें लोक तिच्याविषयीं बोलतात
म्हणतात—"अहो! एक ज्योत होती
आम्हीं ती पाहिली होती
*ज्योत असते!"*

काळी ज्योत!
तें तर अंधारावर अंधाराचें शिल्प असतें
ती हाडाहाडांतून ज्वरागत जळत जाते
डोळ्याडोळ्यांतून तिची खिन्न ज्योत विषाद सांडते
काजळीनें हात माखले जातात
काळ्या तळपायांनीं काळ्याच ठशांची वाट बनत जाते
हळूहळू मान गळते

गुडघ्यांत शिरते
शब्दांचे पंख झडून ते मरून पडतात
लक्षावधि पानांवर !

लाल ज्योत खूप दुरून दिसते
ती हसत हसत डोकें वर करते
नि ढगांवर सोनकडा उमटतात
डोळे भरून येतात
कांहीं न बोलतां सारेंच सांगितलें जातें
उमजतें, गवसतें
अंधाराच्या माथ्यावर सोनेरी पदमुद्रा दिसूं लागतात.

काळी ज्योत
ती तर संशयाचा धूर ओकते
एकेकटाच उरतो काळोखांत प्रत्येक जण
किंकाळी फोडतो :
"शत्रू तूं, शत्रू तूं!"
नि अवचित खिंकाळत सुरा भोसकला जातो
स्वतःच्याच पायाशीं प्रत्येक जण मरून पडतो.

लाल ज्योत एक महान् उत्तर असतें
डोंगरासारख्या उंचउंच पुस्तकांना
कधीं न विचारलेल्या व्याकूळ प्रश्नांना !!
ती दिसते
नि स्वप्नांना पंख फुटतात
रात्रीमागें धावणाऱ्या ताऱ्यांची चाहूल लागते
अंधाराच्या मैदानावर
प्रज्ञेचा ट्रॅक्टर फिरूं लागतो

ठिणग्यांची पेरणी
नि सोनेरी पिकांचीं स्वप्नें पडूं लागतात.

काळी ज्योत म्हणते—थांब !
तुझ्या तोंडावरून हात फिरव
त्यावर काळे डाग आहेत.

लाल ज्योत म्हणते—चल !
पुढें चल
मी तुझ्या डोळ्यांच्या बाहुलींत उभी आहें.

काळी ज्योत म्हणते—मी आहें,
म्हणून तूं नाहींस
तूं मर
मरायचेंच असतें
तेंच तुझ्या हाडाहाडांत आहे.

लाल ज्योत म्हणते—जग
कारण तुझ्या मनाच्या अथांग निळ्या बावडींत
एक दिवा आहे
म्हणून मी तुला दिसूं शकतें आहें.

मला
अंधाराच्या डोंगरांतून
सोनेरी पायवाटा गेलेल्या दिसतात.
शब्दांचे गरुड बनतात
त्यांच्या पंखांखालीं आकाश दबून जातें

जात्यावर मंजुळ ओव्या अजून ऐकूं येतात
कारण मींहि
अशीच एक ज्योत पाहिलेली आहे
म्हणूनच असा निश्चिंत आहें ! !

२१-६-१९५५

# मृत्यो !

मृत्यो!
जेव्हां आकाशभर पसरून तुझा पंजा
लांब नखाचें पातें तूं
खोलवर गळ्यावर दाबतोस
नि प्राण हरून नेतोस
तेव्हां मी
पापणीहि न लववतां
तुजकडे थंडपणें पाहत राहतों.

मृत्यो!
जेव्हां कुणी वाजंत्रीच्या जल्लोशांत
नाहीं, नाहीं, नाहीं म्हणत
मान हालवीत तुझ्याकडे येतात
मुंग्यामुंग्या येतात
पायाखालच्या रस्त्यावर
झिंज्याझिंज्या लोंबतात
सुजलेल्या डोळ्यांवर
तेव्हां मी
कोपऱ्यांतली काठी उचलून
संथ पावलांनीं
तळ्याच्या कांठावर जातों
नि पाहत राहतों
मावळतीचें सौम्य मृदु प्रतिबिंब!
अन् डोळे माझे भरून येतात!

मृत्यो !
तूं नि तुझा जोडीदार
माझा जुना मित्र परमेश्वर
संगनमतानें आकाशांत घुमवतां—पाप, पाप
अन् छाती बडवीत
काळ्या वस्त्रांची लांबच लांब मिरवणूक वाहत असते
न केलेल्या पापाबद्दल शोक करीत
तेव्हां मी
पोपटी माळरानावर शांतपणें बसून राहतों
नि तोडून घेतों
नुकतेंच उमललेलें रानफूल
छातीशीं धरून डोळे मिटून घेतों !
अन् मनाच्या पाताळांत खोल खोल
शुभ्र झरे झुळझुळतांना दिसतात
कल्पकल्पांताचे !

मृत्यो !
तुझ्या संहाराची,
थडग्यांची, क्रसांची रांगच रांग पाहून
डोळे घट्ट मिटले जातात
तुझ्या भयानें
तुझ्या जोडीदाराला—परमेश्वराला—साद घातली जाते
भरलेल्या घोगऱ्या गळ्यानें
तेव्हां मी माझ्या तान्ह्यालाच उचलून घेतों
त्याच्या चमकत्या डोळ्यांकडे पाहत पाहत
जावळावर हळूच डोकें टेकतों
नि हृदयांत पाहतों, तों काय !
असंख्य तारे चमचम करीत असतात !

मग तूं कां आहेस ?
कशाला आहेस ?
आहेस का ?
असा विचार येतो न येतो तोंच
कळा लागून क्षणभर बेशुद्ध होते माता
(नव्हतीशी होते.
जणूं तुझी सरशी होते.)
नि अकस्मात् अवतरतें
टाहो फोडीत बाळाचें आक्रंदन
जंगलाच्या लाखों कळ्या
गवतांतून अवचित उमलतात
अन् तत्काळ उमजतें
कुठें आहे मूळखांब तुझ्या काळ्या साम्राज्याचा !
समाधानानें माझे ओठ
किंचित् विलग होतात.
किंचितच.
कारण मला तुझा स्पर्श कधींच झालेला नव्हता
नाहीं तरी, आज हजारों वर्षें
जन्मोत्सवच पाहत आलों आहें ना
जन्मोत्सवच ! !

१-५-१९५५

# क्षण

अवचित सहजीं
परस्परांच्या सन्मुख
येतां, भिडतां डोळे
खिळुनि उभे राहियलों
हतबुद्ध
हरपुनी शुद्ध.
प्रथमच
छातीच्या सीमेंतिल असीम उच्छ्वासाला रोखित
विस्मित
ऐकुं लागलों आत्म्यांच्या उदधींचें उद्वेलित व्याकुळ गर्जन !
तेव्हां तुझिये डोळे
अथांग झाले होते
अपुल्यांतच !

क्षणभर
उरलें होतें द्यावा-पृथिवी व्यापुन
उसळत जाणारें लयमय उत्कट सत्य
जयांतुन
झन झन झंकृत झाल्या
दोन तनूंच्या वीणा !

जोडीनें सारस पक्षी
कल्लोळांतुनि कापित अंतर
नयनाकाशीं...
तो परमक्षण
आठवतो का तुजला ?

...एकाएकीं
विराट अंबरामधें झळकलीं झळझळ
कोटि श्वेत नक्षत्रें !!
भूताच्या धूमिल देशांतुन
शाश्वत वाहत येणाऱ्या
अंधुक दोन नद्या
मीलन पावुनि क्षणबिंदूशीं
तीव्र गतीनें वाहत गेल्या
लोप पावल्या
भविष्याचिया नील धूसरित कुहरीं...

तो क्षण
त्यांतून उमललीं अमर वैभवें
हीं पुष्पें, ते तारे, हें सारें !
हें अद्भुत सारें
तेव्हांपुन
मी प्रणयी !!

२७-८-१९५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...२३०५६... दि. ...३।८५...
क्रमांक ...९३८... बै. नं. ...२०३१४...

# नाहीं कसली हुरहूर

नाहीं कसली हुरहूर
नाहीं कसलीहि खंत
निळ्या आकाशाखालीं
हासे सागर निवांत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ८४०६
ग्रंथ शाखा स्थल प्रत

आलीं तुफानें विराट
त्यांचे धरूनियां हात
दिलीं सहजीं परतून
गेलीं लवून मुकाट

आले गुलाबांचे गुच्छ
आणि कलिका टपोर
दिला आनंद शिंपून
सांज मिटते समोर

REFBK-0009406
REFBK-0009406

नाहीं कसली हुरहूर
नाहीं कसलीहि खंत

आज विसावे माझ्यांत
तुझें ऐश्वर्य अनंत

१-१-१९५५